कृषीवल
रायगड, सोमवार, दि. ९ मार्च २०२६
किंमत ४ ₹

## इराणचा पलटवार

**नवी दिल्ली :** इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल युद्ध दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. इस्रायलकडून इराणच्या तेल साठवलेल्या गोदामांना लक्ष्य करण्यात आले. अमेरिकेकडूनही हवाई हल्ले सुरूच असून, इराणने जोरदार पलटवार करत अमेरिकेच्या पाचव्या युद्धनौकेवर बॉम्ब वर्षाव केला. यात २१ सैनिक मारले गेले असल्याचा दावा इराणी लष्करी दलाने केला आहे. इराणच्या लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, बहरीनमध्ये तैनात असलेल्या अमेरिकेच्या पाचव्या युद्धनौकेवर हवाई हल्ला करण्यात आला. अमेरिककडून करण्यात आलेल्या हल्ल्यात इराणच्या लष्कराचेही नुकसान झाले आहे.

## टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** टँकरने दिलेल्या धडकेत मनोज रामजी कांबळे (३८, रा. इच्छापूर्ती बिल्डिंग, घरकुल सोसायटी, ऊसर्ली गाव) याचा मृत्यू झाला. पनवेल शहर पोलीस ठाण्यात टँकर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मनोज कांबळे हा घरातून कामावर जात होता. यावेळी ऊसर्ली गाव येथे आला असता पाण्याचा टँकरवरील चालकाने टँकर वेगाने चालवत मनोजला समोरून धडक दिली. अपघातात मनोज कांबळे याचा मृत्यू झाला. या अपघाताचा अधिक तपास पनवेल शहर पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## वे|ध|क

### तरुणीचा लैंगिक छळ

**वर्धा :** जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तरुणीवर दीर्घकाळ लैंगिक छळ केल्याचा आरोप असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंधित ज्येष्ठ नेते दिवाकर गमे (७८) यांना पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून, राजकीय वर्तुळातही चर्चेला उधाण आले आहे. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपीने नोकरीचे आमिष दाखवून तिचा दीर्घकाळ मानसिक व लैंगिक छळ केला. सुमारे पाच वर्षांपूर्वी या प्रकाराची सुरुवात झाली असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. २०२२ साली पीडिता केवळ २१ वर्षांची असताना आरोपीने तिला वारंवार शारीरिक संबंधांची मागणी केल्याचा आरोप आहे.

### संतोष देशमुख हत्या प्रकरण; आरोपीला दिलासा

**बीड :** बीडच्या मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी जयराम चाटे याला जिल्हा न्यायालयाने तात्पुरता दिलासा दिला आहे. भावाच्या बाराव्या दिवसाच्या धार्मिक विधीसाठी १३ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत पोलिस बंदोबस्तात गावी जाण्याची परवानगी न्यायालयाने दिली. व्ही.एच. पाटवदकर यांनी मानवतावादी दृष्टिकोनातून हा निर्णय दिला. आरोपीच्या वकिलांनी सर्व अटींचे पालन करण्याची तसेच पोलिस बंदोबस्ताचा खर्च भरण्याची तयारी दर्शवली होती. सरकारी पक्षाने विरोध केला असला तरी न्यायालयाने मर्यादित वेळेसाठी परवानगी दिली.

### कर्जत-मुरबाड मार्गावर भीषण अपघात

**नेरळ :** कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून, दुसरा गंभीर जखमी झाला आहे. जखमीवर रायगड उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दुचाकीची रस्त्यात आलेल्या गायीला धडक बसल्याने हा अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे. अपघातग्रस्त तरुण लोभेवाडी जवळील फोंडेवाडी येथील रहिवासी असल्याचे समजते. कर्जत तालुक्यातील कर्जतकशेळेमुरबाड या राज्यमार्गावर आंबिवली फाटा परिसरात शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. फोंडेवाडी येथील हरिचंद्र ढोले (वय २५) आणि मालू ढोले पान २ वर

## अपूर्ण मुंबई-गोवा महामार्गावर तीन टोलनाके

# कोकणवासियांची लूट

### प्रवाशांच्या खिशावर तिहेरी भार; संतापाची लाट

सलीम शेख

। माणगाव ।

**कोकणाची जीवनरेखा मानल्या जाणाऱ्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम अजूनही पूर्णत्वास गेलेले नसताना आता प्रवाशांवर तीन टोलनाक्यांचा भार टाकण्याची तयारी सुरू झाल्याने कोकणवासियांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. अपूर्ण रस्ता, निकृष्ट दर्जाचे गावाकडचे मार्ग, अपुऱ्या सुविधा आणि वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे आधीच त्रस्त असलेल्या कोकणवासियांना आता एका प्रवासात तीन वेळा टोल भरावा लागणार असल्याची माहिती समोर आल्याने संतापाची लाट उसळली आहे.**



महामार्गाच्या पहिल्या टप्प्यातील पळस्पे ते इंदापूर या सुमारे ९० किलोमीटरच्या अंतरात खारपाडा आणि खांब या दोन ठिकाणी टोल नाके उभारण्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. या दोन टोल नाक्यांमुळे या मार्गाने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना एका प्रवासात दोनदा टोल भरावा लागणार आहे. याशिवाय पुढील टप्प्यात पोलादपूरजवळील लोहारे येथेही टोलवसुली सुरू होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या ठिकाणी टोलनाका उभारण्यात आला असून, सिग्नल यंत्रणाही सुरू झाल्याची माहिती पान २ वर

### १६ वर्षांपासून रखडलेले काम

दरम्यान, या महामार्गाच्या कामाला आता तब्बल १६ वर्षांहून अधिक काळ उलटून गेला आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण आणि रुंदीकरणाचे काम २०११ साली सुरू झाले. मात्र निधीअभावी, पर्यावरणीय परवानग्या, भूसंपादनातील अडचणी आणि काही ठेकेदारांच्या निष्क्रियतेमुळे हे काम वर्षानुवर्षे रखडत गेले. परिणामी, आजही या महामार्गाचे अनेक भाग अपूर्ण अवस्थेत आहेत, तर काही ठिकाणी अजूनही बांधकाम सुरू आहे. नागोठणे आणि कोलाड परिसरातील पुलांची कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत.

### टोलवसुलीची घाई का?

महामार्गाचे काम पूर्ण झालेले नसताना टोलवसुली सुरू करण्याची घाई प्रशासनाला का आहे, असा प्रश्नही आता नागरिक विचारू लागले आहेत. रस्त्यावर अजूनही खड्डे, अपूर्ण पूल, वारंवार होणारी वाहतूक कोंडी आणि अपुऱ्या सुविधा असताना प्रवाशांकडून टोल आकारणे कितपत योग्य आहे, असा सवालही उपस्थित केला जात आहे. या महामार्गाच्या कामामुळे गेल्या काही वर्षांत अनेक अपघात झाले असून, अनेक निरपराध नागरिकांचे बळी गेले आहेत. त्यामुळे रस्ता पूर्ण, सुरक्षित आणि दर्जेदार झाल्यानंतरच टोल आकारावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



## मनसेचा वर्धापनदिन झाडांच्या जीवावर

### लहान झाडांना बांधले झेंडे; पर्यावरणप्रेमींमध्ये नाराजी

। महाड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा वर्धापनदिन सोमवार, दि. ९ मार्च रोजी रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी पाचाड येथे होणार आहे. मात्र, या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर महामार्गालगत लावण्यात आलेल्या पक्षाच्या मोठ मोठ्या झेंड्यांमुळे लहान झाडांना धोका निर्माण झाल्याची बाब समोर आली असून, पर्यावरणप्रेमींकडून नाराजी व्यक्त होत आहे.

राजठाकरेयांच्यास्वागतासाठी महाड-रायगड महामार्गालगत अनेक ठिकाणी मनसेचे मोठे झेंडे लावण्यात आले आहेत. मात्र, हे झेंडे रस्त्याच्या कडेला नुकतीच लावण्यात आलेल्या लहान रोपांना आणि त्यांच्या संरक्षणासाठी लावलेल्या जाळीला बांधण्यात आल्याचे दिसून येत आहे. झेंडे सतत वाऱ्यामुळे फडकत असल्याने त्याचा ताण थेट या झाडांवर येत असून, त्यामुळे रोपे वाकण्याची किंवा तुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महामार्ग रुंदीकरणाच्या वेळी या मार्गावरील अनेक मोठ्या वृक्षांची तोड करण्यात आली होती. त्यावेळी पर्यावरणप्रेमींनी तीव्र विरोध दर्शवला होता. मात्र, विकासाच्या दृष्टीने हा निर्णय घेत असल्याचे सांगत त्याठिकाणी नव्याने अधिक प्रमाणात झाडे लावली जातील, असे आश्वासन प्रशासनाने दिले होते. पान २ वर

### रायगडावरुन सदस्य नोंदणीला प्रारंभ

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा सोमवार, दि. ९ मार्च रोजी वर्धापन दिन आहे. त्या पार्श्वभूमीवर उद्यापासून मनसेच्या सदस्य नोंदणीला सुरुवात होणार आहे. राज ठाकरे यांनी स्वत: सोशल मीडियावर पोस्ट करत याबाबत माहिती दिली आहे. तसेच ते उद्या रायगड येथे जाऊन शिवरायांचा आशीर्वाद घेणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. विशेष म्हणजे, यंदा फक्त कार्यकर्त्यांचीच नाही, तर महाराष्ट्रासाठी आणि मराठी भाषेसाठी करणाऱ्या प्रत्येकासाठी ही सदस्य नोंदणी असणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

मराठी माणूस आणि मराठी भाषा यांच्यासाठी आक्रमकपणे लढणाऱ्या पक्षाचा आणि एका विचाराचा हा वर्धापनदिन असल्याचे राज ठाकरे म्हणाले. यानिमित्ताने पक्षाची सदस्य नोंदणी १० मार्च २०२६ पासून सुरु होत आहे. उद्या ९ मार्चला मी सकाळी रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून माझ्यापासून सदस्य नोंदणीची सुरुवात करत आहे. या रायगडाने पान २ वर

## करंजा-रेवस रेड्डी प्रकल्पामुळे

# मच्छिमारांचे अस्तित्व धोक्यात

। अलिबाग । प्रतिनिधी ।

करंजा-रेवस रेड्डी समुद्री मार्ग प्रकल्पामुळे पारंपरिक मच्छिमारांचे उपजीविकेचे साधन धोक्यात आले असतानाही प्रशासन व लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा तीव्र आरोप मच्छिमार संघटनांनी केला आहे. बाधित मच्छिमारांना नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन देऊनही आठ-दहा महिने कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने मच्छिमारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

करंजा-रेवस रेड्डी समुद्री मार्ग प्रकल्पासंदर्भात रविवारी अलिबाग येथील शेतकरी भवनमध्ये रविवार, दि. ८ मार्च रोजी रायगड जिल्ह्यातील विविध मच्छिमार संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला रायगड जिल्हा संघ सागरकन्या मच्छिमार सोसायटी मुरुडचे पान २ वर



### लोकप्रतिनिधींनी आम्हाला वाऱ्यावर सोडले : सीताराम नाखवा

#### ‘नुकसानभरपाई तात्काळ द्यावी’

सरकारने ९ मार्च २०२३ रोजी काढलेल्या आदेशानुसार या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना आर्थिक नुकसानभरपाई देण्याचा निर्णय आहे. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही मदत मिळालेली नाही. त्यामुळे मच्छिमारांना लोकप्रतिनिधींनी पूर्णपणे वाऱ्यावर सोडल्याची भावना बैठकीत व्यक्त करण्यात आली. दरम्यान, मच्छिमारांचे प्रश्न तातडीने सोडवले नाहीत तर पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### पर्यटकांवर मधमाशांचा हल्ला

। पुणे । प्रतिनिधी ।

किल्ले सिंहगडावर पर्यटकांवर मधमाशांच्या मोहळाने हल्ला केल्याची घटना घडली. या घटनेत सुमारे ७ ते ८ पर्यटकांना मधमाशांनी चावल्याने ते जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले. घटनेची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमींना उपलब्ध वाहनांमधून तसेच पथकाच्या मदतीने किल्ल्यावरून खाली आणून दवाखान्यात दाखल करण्यात आले. दरम्यान, ऋषिकेश सोनार यांच्या दीड वर्षांच्या बाळालाही मधमाशांनी चावल्याची माहिती समोर आली आहे. प्रशासनाने पर्यटकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

## पुरोगामी युवक संघटना सदस्यपदी विनय म्हात्रे



। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक संघटना सदस्यपदी चौल येथील विनय म्हात्रे याची निवड करण्यात आली आहे. शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या उपस्थितीत त्याला सदस्यपदाचे मानपत्र प्रदान करण्यात आले.

विनय म्हात्रे हा उच्चशिक्षित असून, सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असतो. चौल परिसरातील तरुणवर्गाचा त्याला मोठा पाठिंबा असल्याने शेकापच्या संघटनात्मक वाढीसाठी त्याचे योगदान महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास चित्रलेखा पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. पक्षाच्या कार्याला गती देण्यासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी शेकापचे कार्यकर्ते अमित फुंडे, हेमंत पाटील, राजेंद्र ठाकूर, भालू म्हात्रे, अभिजित वाळंज आदी उपस्थित होते. विनयच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्याचे कौतुक करण्यात येत आहे.

## बगाड यात्रेत गुलालाची उधळण...



• महाराष्ट्रातील वाई बावधन येथील बगाड यात्रा लाखो भक्तांच्या उपस्थितीत गुलालाने न्हाऊन निघाल्याचे दृश्य. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

### पुरस्काराने गौरव | डॉ. प्रियांक म्हात्रे ‘सर्वात तरुण कृषी शास्त्रज्ञ’

# वढावच्या सुपुत्राची राष्ट्रीय पातळीवर झेप

संतोष पाटील

। हमरापूर ।

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील वढाव या छोट्याशा गावातून देशाच्या कृषी संशोधन क्षेत्रात मोठी झेप घेणाऱ्या डॉ. प्रियांक म्हात्रे यांचा भारत सरकारच्या कार्यक्रमात ‘सर्वात तरुण कृषी शास्त्रज्ञ’ म्हणून गौरव करण्यात आला आहे. हैदराबाद येथे झालेल्या या कार्यक्रमात मिळालेल्या सन्मानामुळे पेण तालुका आणि रायगड जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर झळकले आहे.

पेण तालुक्यातील वढाव येथील डॉ. हनुमान म्हात्रे यांचे सुपुत्र डॉ. प्रियांक म्हात्रे यांचा हैदराबाद येथे झालेल्या कार्यक्रमात ‘सर्वात तरुण कृषी शास्त्रज्ञ’ म्हणून सन्मान करण्यात आला. भारत सरकारच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. लहानपणापासूनच अभ्यासात हुशार असलेल्या डॉ. प्रियांक म्हात्रे यांनी अवघ्या २६ व्या वर्षी भारतीय अनुसंधान केंद्र दिल्ली येथे डॉक्टर ऑफ फिलॉसिफी ही पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी ॲग्रीकल्चर रिसर्च सर्विसमध्ये देशात प्रथम क्रमांक मिळवून मोठे यश संपादन केले. सध्या ते रिसर्च न्यू स्टाईल नून स्टाईन सिमला येथे शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. नेमाटोलॉजी या विषयावरील त्यांच्या संशोधनाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे.

कृषी संशोधन क्षेत्रात त्यांनी अमेरिकेत केंब्रिज विद्यापीठ, त्याचबरोबर युके, मास्कोमध्ये ॲग्रीकल्चर अशा विविध देशांतील विद्यापीठांमध्ये संशोधन प्रबंध सादर केले आहेत. विशेषतः भारत सरकार तसेच इतर आंतरराष्ट्रीय कृषी पान २ वर



> “ग्रामीण भागातून येऊन राष्ट्रीय स्तरावर संशोधन क्षेत्रात नाव कमावणे ही मोठी बाब आहे. डॉ. प्रियांक म्हात्रे यांनी तरुणांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.”
> – स्थानिक नागरिक, वढाव

## जिल्ह्यात पशुधन विमा कवच

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

पशुधनाच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांवर येणारा आर्थिक ताण कमी व्हावा आणि त्यांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने जिल्ह्यात पशुधन विमा कवच योजना राबविण्यात येत आहे. भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत ही पशुधन विमा योजना प्रभावीपणे अंमलात आणली जात असून, जिल्ह्यात आतापर्यंत एकूण १०७ शेतकऱ्यांनी पशुधन विमा कवचाचा लाभ घेतला आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत पशुधन विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कोकण विभागीय समन्वयक आकाश हवालदार यांनी केले आहे.



भारतीय कृषी विमा कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. विविध शासकीय योजना तसेच वैयक्तिक पशुधन विमा प्रस्तावांद्वारे पशुपालकांना विमा संरक्षण उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात येत आहे. बँक कर्ज योजनेंतर्गत माणगाव तालुक्यात नऊ, तर श्रीवर्धन तालुक्यात पाच असे एकूण १४ प्रस्ताव पूर्ण झाले आहेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत २० प्रस्ताव पूर्ण करण्यात आले आहेत. तर, प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास योजनेत महाड तालुक्यात १९, माणगावमध्ये सहा आणि खालापूरमध्ये ११ असे एकूण ३६ प्रस्ताव पूर्ण करण्यात आले आहेत.

याशिवाय वैयक्तिक पशुधन विमा अंतर्गत ३७ प्रस्ताव पूर्ण झाले आहेत. एमएच पान २ वर

# जिल्हा रुग्णालय राज्यात दुसरे

## 'महा आरोग्य' व 'आरोग्य रत्न' पुरस्काराने गौरव




। अलिबाग । प्रतिनिधी ।

आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत ई-सुश्रुत प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करत रायगड जिल्हा रुग्णालयाने राज्यात दुसरा क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या उपक्रमामुळे रुग्णसेवा अधिक वेगवान, पारदर्शक आणि कार्यक्षम झाली असल्याचे प्रशासनाने सांगितले.

रुग्णालयातील कामकाज ई-सुश्रुत प्रणालीद्वारे पूर्णपणे डिजिटल करण्यात आले असून, रुग्ण नोंदणी, तपासणी, उपचार आणि संदर्भ प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. जानेवारी २०२६ या महिन्यात रुग्णालयात सहा हजारांहून अधिक टोकन जनरेट करण्यात आले असून, त्यापैकी तीन हजारांहून अधिक हेल्थ रेकॉर्डचे लिंकिंग ऑनलाईन ओपीडीद्वारे करण्यात आले आहे. तसेच रुग्णालयातील सर्व १६ विभागांचे कामकाज डिजिटल पद्धतीने सुरू आहे.

या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर तसेच सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते रायगड जिल्हा रुग्णालयाला 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार' आणि 'महा आरोग्य पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

यावेळी ठाणे सर्कलचे उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शीतल जोशी, मेट्रन गायत्री म्हात्रे, मालती मोकल, स्मिता जोशी, फॅसिलिटी मॅनेजर आशेषा नवसिन पटेल तसेच जिल्हा रुग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यामध्ये १४ मार्चला राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि.१४ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असून, या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग राजेंद्र द. सावंत यांनी केले आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाहविषयक प्रलंबित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबत वादपूर्व प्रकरणे, भारत दूरसंचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबत वादपूर्व प्रकरणे सदर लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात.

लोकअदालतीचे फायदे पक्षकारांना कोणत्याही प्रकारची फी भरावी लागणार नाही. लोकन्यायालयाच्या निवाडयाविरूध्द अपील नाही. न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकन्यायालयात होणाऱ्या निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. खटल्यांमध्ये साक्षी-पुरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणामध्ये कायद्यानूसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते व निर्णय अंतिम व बंधनकारक असतो. लोक अदालतीमध्ये प्रकरण निकाली निघाल्यास वेळ, पैसा व श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होते.

यापूर्वी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रलंबित ५ हजार १६९ आणि वादपूर्व १२ हजार ७५१ असे एकूण १७ हजार ९२० एवढी प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामुळे रायगड जिल्ह्यातील संपूर्ण नागरिकांना फायदा झाला आहे. नागरीकांना ही संधी पुन्हा मिळणार आहे.

# सराईत गुन्हेगार दोन वर्षांसाठी तडिपार

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील सराईत गुन्हेगारांच्या टोळीविरुद्ध कठोर कारवाई करत रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या आदेशाने चार जणांना दोन वर्षांसाठी हद्दपार (तडिपार) करण्यात आले आहे. या कारवाईमुळे कर्जत शहर आणि परिसरातील गुन्हेगारीवर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. हद्दीत कार्यरत असलेल्या या टोळीविरुद्ध सहा सामाईक गुन्हे, चार स्वतंत्र गुन्हे तसेच १७ अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद आहे. या पार्श्वभूमीवर टोळी प्रमुखासह चार जणांना दोन वर्षांच्या कालावधीसाठी रायगड जिल्ह्यासह लगतच्या पुणे, मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे या जिल्ह्यांतून हद्दपार करण्याचे आदेश दिले आहेत.

हद्दपार करण्यात आलेल्यांमध्ये सूरज राम जाधव (२५, रा. आमराई, ता. कर्जत) हा टोळी प्रमुख असून, गणेश सोमनाथ साळुंखे (२४), सोहेल सिद्दीकी अन्सारी (२५) आणि विकी मारुती जाधव (३०) हे त्याचे साथीदार आहेत. या चौघांविरुद्ध कर्जत परिसरात शरीराविरुद्धचे गुन्हे, मारहाण तसेच दहशत निर्माण करणाऱ्या अनेक घटना नोंद झालेल्या आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, या टोळीने आर्थिक फायद्यासाठी तसेच परिसरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने अनेकदा बेकायदेशीर जमाव करून नागरिकांवर हल्ले केले आहेत. कोणी विरोध केल्यास त्याच्यावर आक्रमकपणे हल्ला करून मारहाण करण्याचे प्रकारही सातत्याने घडत होते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये या टोळीविषयी भीती आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या गुन्हेगारांवर यापूर्वी अनेक वेळा अटक तसेच प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. मात्र जामिनावर बाहेर आल्यानंतर त्यांनी पुन्हा गुन्हेगारी कृत्ये सुरू ठेवली. त्यामुळे त्यांच्यावर कायद्याचा धाक उरलेला नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ही कठोर कारवाई केली आहे.

# गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

। पनवेल । प्रतिनिधी ।

एक २८ वर्षीय इसमाने राहत असलेल्या घराचे हॉलमधील सिलींग फॅनला साडीच्या सहायाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

मयत अतुल वाघेला याने कोणत्यातरी अज्ञात कारणास्तव तो राहत असलेल्या घराचे हॉलमधील सिलींग फॅनला साडीच्या सहायाने गळफास आत्महत्या केली. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# शाश्वत पाण्यासाठी जिल्ह्यात 'जलमहोत्सव'

## दि. ८ ते २२ मार्च २०२६ दरम्यान साजरा होणार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

देशातील ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणा अधिक शाश्वत व मजबूत करण्यासाठी आणि सामुदायिक सहभाग वाढवण्यासाठी ८ ते २२ मार्चदरम्यान जल महोत्सव देशभर राबविण्यात येणार आहे.

पाणी ही केवळ पायाभूत सुविधांची बाब राहिलेली नाही तर ती सांस्कृतिक पद्धती म्हणुन पाण्याची जपणूक करावी. पाण्याच्या संवर्धाना साठी स्थानिक परंपरा यांचा उपयोग मुख्यत: विचारात घ्यावेत. सदर जलमहोत्सवादरम्यान गावागावात पाणी तपासणीसाठी महिलांना प्रोत्साहन देणे, फिल्ड टेस्टिंग किटद्वारे पाण्याची गुणवत्ता तपासणी करणे ,प्रत्येक गावात युवकांचा जल संवर्धनासाठी सहभाग घेण्यासाठी यंग बिग्रेडची स्थापना ,जिल्ह्यातील शाळांमध्ये जलसंवर्धनासाठी स्पर्धाचे आयोजन करणेत येणार आहेत. ग्रामपंचायत विकास आराखड्यात पाण्याच्या संवर्धानासाठी उपाययोजनांचा समावेश करणेत यावा. ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणा आधिक शाश्वत आणि मजबूत करण्यासाठी सामुदायिक लोकसहभाग वाढवण्यासाठी दि. ८ ते २२ मार्च या कालावधीत जलमहोत्सव राबविला जाणार आहे, अशी माहिती प्रकल्प संचालक जल जीवन मिशन शुभांगी नाखले यांनी दिली.

गाव, पंचायत समिती स्तरावर लोक जल उत्सव आयोजित केला जाईल, जो पूर्णपणे लोकसहभागावर आधारीत असणार आहे.पिण्याच्या पाण्यालासांस्कृतिकआणिसामाजिक प्राधान्य देणे, स्थानिक जलउत्सव संस्थांत्मक करण्यासाठी प्रोत्साहित करणे, राज्य ते गावस्तरापर्यंत विविध विभागांमध्ये समन्वय साधणे, पाणी गुणवत्ता, सौर ऊर्जा आणि देखभाल दुरूस्तीसाठी दिर्घकालीन आराखडा तयार करणे, आरोग्य, पोषण आणि महिला सक्षमीकरणाला जलसेवेशी जोडणे हा जलमहोत्सवाच्या उपक्रमाचा उद्देश आहे, असे ग्रामपंचायत पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मोहन सरवदे यांनी सांगितले.

पान १ वरून

## कोकणवासियांची लूट

समोर आली आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना भविष्यात तीन ठिकाणी टोल भरावा लागू शकतो. या घडामोडींमुळे ''रस्ता पूर्ण नसताना टोल कशासाठी?'' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, अपूर्ण रस्त्यावर टोल वसुलीचा निर्णय घेतल्यास तो कोकणवासीयांच्या जखमेवर मीठ चोळणारा ठरेल, अशी भावना सध्या सर्वत्र व्यक्त होत आहे. या निर्णयाविरोधात विविध सामाजिक संघटनांनी आंदोलनाचा इशाराही दिला असून, प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देण्याची मागणी कोकणवासीयांकडून करण्यात येत आहे.

**टोल किती असणार?**

टोलचे दर किती असतील याबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. मात्र, येत्या काही दिवसांत यासंदर्भात अधिसूचना प्रसिद्ध होण्याची शक्यता असल्याचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. टोलवसुली सुरू झाल्यानंतर वाहनधारकांच्या खिशाला मोठा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**गावाकडे जाणारे रस्ते निकृष्ट**

दरम्यान, या महामार्गाच्या पहिल्या टप्प्यात पळस्पे ते इंदापूर या दरम्यान अनेक गावांना जोडणारे रस्ते आहेत. मात्र, या गावांकडे जाणारे बहुतांश रस्ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून सातत्याने केली जात आहे. काही ठिकाणी तर केवळ ब्लॉक टाकून तात्पुरते रस्ते तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे या रस्त्यांवरून प्रवास करताना गावकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

यासंदर्भात अक्षरा ढाके जगताप यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, महामार्ग विभागाकडून झेंडे लावण्यासाठी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. या प्रकरणाची माहिती घेऊन संबंधितांशी चर्चा करून आवश्यक ती कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## कर्जत-मुरबाड मार्गावर भीषण अपघात

(वय ४८) हे दोघे कशेळे येथून कर्जतच्या दिशेने दुचाकीवरून निघाले होते. हरिचंद्र ढोले यांच्या पत्नीला कर्जत येथील रायगड उपजिल्हा रुग्णालयात बाळ झाले होते. त्या बाळाची विचारपूस करण्यासाठी ते दोघे कर्जतला जात होते.

आंबिवली फाटा परिसरातील उतारावरून जात असताना अचानक रस्त्यात गाय आल्याने दुचाकी चालकाचा ताबा सुटला आणि एमएच ४६ एटी १९३० क्रमांकाची हिरो होंडा सुपर स्प्लेंडर ही दुचाकी गायीच्या वासराला जाऊन धडकली. या धडकेत भीषण अपघात होऊन मालू ढोले यांचा जागीच मृत्यू झाला. तर, हरिश्चंद्र ढोले यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर जखमी हरिचंद्र ढोले यांना तातडीने कशेळे ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून टाके घालत पुढील उपचारासाठी त्यांना हलविण्याचा निर्णय घेतला. मात्र कशेळे ग्रामीण रुग्णालयातील ॲम्ब्युलन्स सेवा बंद असल्याने जखमी रुग्णाला हलविण्यात अडचणी निर्माण झाल्या.

दरम्यान, डॉ. झेंडे यांनी तात्काळ खांडस आणि आंबिवली येथील रुग्णवाहिकांशी संपर्क साधून रुग्णवाहिका मागवली. त्यानंतर जखमीला पुढील उपचारासाठी रायगड उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## मनसेचा वर्धापनदिन झाडांच्या जीवावर

त्यानंतर या मार्गालगत मोठ्या प्रमाणात रोपे लावण्यात आली होती. मात्र, आता वर्धापनदिनाच्या निमित्ताने झेंडे लावण्यासाठी या नव्याने लावलेल्या रोपांचा आधार घेतल्यामुळे त्यांना धोका निर्माण झाल्याची टीका होत आहे. झेंडे फडकताना झाडे सतत हलत राहिल्यास त्यांच्या मुळांवर परिणाम होऊन ती सुकण्याची शक्यता असल्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, झाडे वाचवण्याच्या मुद्द्यावर आवाज उठवणाऱ्या संघटनांनीही या प्रकाराबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. पर्यावरणाचे संरक्षण करण्याची भूमिका घेणाऱ्या पक्षानेच अशा प्रकारे झाडांना हानी पोहोचेल अशा पद्धतीने झेंडे लावणे कितपत योग्य आहे, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

## मनसेच्या सदस्य नोंदणीला रायगडावरुन प्रारंभ

महाराजांचं वास्तव्य अनुभवलंच, पण शिवराज्याभिषेकाचा साक्षीदारदेखील हा किल्लाच, अशी प्रतिक्रिया राज ठाकरेंनी दिली.

पुढे ते म्हणाले, अशा पावन ठिकाणी जाऊन आपण आपली सदस्य नोंदणी सुरु करत आहोत. आपली सदस्य नोंदणी ही महाराष्ट्र सैनिकांपुरतीच मर्यादित नाही हे मुळात लक्षात घ्या. तुम्ही सदस्य नोंदणी कराच, पण ज्यांना ज्यांना महाराष्ट्राला आकार द्यायचा आहे, ज्यांना ज्यांना सद्यःपरिस्थितीबद्दल राग आहे, अशा सगळ्यांना आपल्याला, आपल्या नवनिर्माणाच्या ध्यासासोबत जोडून घ्यायचं आहे. तुमच्यासकट जे जे नव्याने आपल्यासोबत जोडले जाणार आहेत, ते आपण सगळे महाराष्ट्राचे पाईक आहोत याचं भान तुम्हीही ठेवा आणि लोकांना पण द्या. सदस्य नोंदणी डिजिटल स्वरूपात होणार असल्याची माहितीही राज ठाकरे यांनी यावेळी दिली. सदस्य नोंदणी डिजीटल स्वरुपातही होणार आहे. ज्याचा तपशील तुम्हाला १० मार्चला कळलेच, फक्त पक्षाच्या शाखांच्या बाहेर स्टॉल्स लावून चालणार नाही तर सर्व वर्दळीच्या ठिकाणी माझे महाराष्ट्र सैनिक दिसले पाहिजेत, उदा. मार्केट, शाळा, मंदिरं, कॉलेज, मैदानं, बागा वगैरे अशा गजबजलेल्या सर्व ठिकाणी आपली सदस्य नोंदणीची टेबल्स लागली पाहिजेत. येणाऱ्या जाणाऱ्यांशी संवाद साधत त्यांना आपलंस करत ही सभासद नोंदणी करा, असे आदेशही त्यांनी कार्यकर्त्यांना दिले.

प्रश्न आकड्याचा नाहीये, तशीही आपली सदस्य नोंदणी ही कायम मोठीच होते. पण, यावेळेस महाराष्ट्र म्हणून, मराठी म्हणून सामान्य मराठी माणसाची महाराष्ट्राचा पाईक होण्याची इच्छा किती तीव्र आहे आणि सरकार किती चुकीच्या पद्धतीने सर्व गोष्टी हाताळते आहे याचा राग सर्वांच्या मनात किती आहे हेदेखील स्पष्ट होईल. त्यामुळे जोरदार सदस्य नोंदणी होईल यासाठी पूर्ण कसोशीने प्रयत्न करा, असंही त्यांनी सांगितलं.

## जिल्ह्यात पशुधन विमा कवच

बंडल केलेले (शेळी व मेंढी) अंतर्गत एकूण ३२ प्रस्तावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पशुपालक शेतकऱ्यांना विमा संरक्षणाचा लाभ मिळत असून, पशुधनाच्या नुकसानीमुळे होणारा आर्थिक धोका कमी करण्यास मोठी मदत होत आहे. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात विमा प्रतिनिधी नेमण्यात आले आहेत. भविष्यातही अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पशुधन विमा योजना पोहोचवून त्यांना आर्थिक सुरक्षितता मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले जाणार असल्याचे कोकण विभागीय समन्वयक आकाश हवालदार आणि रायगड जिल्हा प्रतिनिधी राहुल लाडगे यांनी सांगितले.

यावेळी सतीश इंद्रे, जय धारिया, गणेश सुरते, स्वप्नील पवार, अनिल तांडेल, पल्लवी कदम, प्रद्युम्न ढोबळे, आप्पासाहेब घोडके, रोहन सरकटे, आकांशा माळी, अनुज पाटील, संग्राम ओंबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## वढावच्या सुपुत्राची राष्ट्रीय पातळीवर झेप

विद्यापीठांमध्ये त्यांच्या संशोधनाची दखल घेण्यात आली आहे.

वाशी खारेपाट परिसरातील वढावसारख्या ग्रामीण भागातून पुढे येत कृषी संशोधन क्षेत्रात मोठी झेप घेतल्यामुळे डॉ. प्रियांक म्हात्रे यांनी केवळ पेण तालुकाच नव्हे तर, संपूर्ण रायगड जिल्ह्याचे नाव देशभरात उज्ज्वल केले आहे. त्यांच्या संशोधनामुळे भविष्यात शेतकऱ्यांना नवे तंत्रज्ञान आणि मार्गदर्शन मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे. या उल्लेखनीय यशामुळे वढाव गाव, वाशी पंचक्रोशी, पेण तालुका तसेच संपूर्ण रायगड जिल्ह्यामधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मच्छिमारांचे अस्तित्व धोक्यात

उपाध्यक्ष मनोहर बैले, रायगड जिल्हा मच्छिमार सेलचे अध्यक्ष सीताराम नाखवा, महालक्ष्मी मच्छिमार संस्थेचे विजय गिदी, दर्यासारंग मच्छिमार सोसायटी रेवदंडाचे शरद वरसोलकर, आई महाकालवाशी हवेली मच्छिमार सोसायटीचे ज्ञानदेव तांडेल, महादेव कृपा सहकारी मच्छिमार सोसायटी तुरुंबाडीचे चेअरमन अनंत पाटील, लक्ष्मण भिकारी, चंद्रकांत शिनु, शिवस्मृती मच्छिमार संस्था कोलईचे नितीन कणगी, हरी बेडेकर, करंजा उरणचे प्रसाद नाखवा, नवनिर्माण मच्छिमार संस्था आग्रावच्या शरयू अधिकारी, रवींद्र रामनाथकर, दिगंबर चोगले, रवींद्र चोगले, चिंतामण लोदी, रामचंद्र वाघरे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना सीताराम नाखवा यांनी सांगितले की, सरकारच्या महत्त्वाकांक्षी करंजा-रेवस रेड्डी प्रकल्पांतर्गत एकूण नऊ पुलांचे काम सुरू असून, त्यापैकी चार पुलांचे काम रायगड जिल्ह्यात सुरू आहे. विकासाच्या नावाखाली हा प्रकल्प राबविला जात असला तरी त्याचा सर्वाधिक फटका स्थानिक पारंपरिक मच्छिमारांना बसणार आहे. पूल उभारल्यानंतर जाळी टाकून मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांचे मासेमारी क्षेत्र पूर्णपणे नष्ट होण्याची भीती आहे. करंजा-रेवस पुलाचे काम सध्या सुमारे २५ टक्के पूर्ण झाले असून, बाधित मच्छिमारांचे पंचनामे करून त्यांना तातडीने आर्थिक नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या प्रश्नासाठीच मुरुड, रेवदंडा, आग्राव, अलिबाग, रेवस, उरण, तुरुंबाडी आणि राजपुरी येथील मच्छिमारांचे प्रतिनिधी एकत्र आल्याचे नाखवा यांनी सांगितले. करंजा येथे या प्रकल्पाच्या कामाला जानेवारी महिन्यात सुरुवात होताच मच्छिमारांनी आंदोलन करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. त्यानंतर उपजिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन सरकारपर्यंत भूमिका पोहोचविण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, आठ-दहा महिने उलटूनही या प्रश्नावर कोणतीही बैठक घेतली गेली नसल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. आंदोलनादरम्यान पोलिसांची दंडेलशाही, गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देऊन आंदोलकांना त्रास देण्यात आल्याचेही नाखवा यांनी सांगितले. या प्रश्नासाठी स्थानिक आमदार तसेच खासदार सुनील तटकरे यांची भेट घेऊनही ठोस भूमिका घेतली गेली नाही. उलट, खा. तटकरे यांनी मच्छिमारांना भरपाई कशाची द्यायची असा प्रश्न विचारला गेला, असा आरोपही त्यांनी केला. सरकारने ९ मार्च २०२३ रोजी काढलेल्या आदेशानुसार या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना आर्थिक नुकसानभरपाई देण्याचा निर्णय आहे. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही मदत मिळालेली नाही. त्यामुळे मच्छिमारांना लोकप्रतिनिधींनी पूर्णपणे वाऱ्यावर सोडल्याची भावना बैठकीत व्यक्त करण्यात आली. मंत्री नितेश राणे करंजा येथे आले असताना मच्छिमारांनी निदर्शने केली होती. तसेच खा. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही पत्र देऊन बाधित मच्छिमारांना नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली होती. परंतु, अद्याप कोणताच ठास निर्णय न घेण्यात आल्याने मच्छिमारांमध्ये संतापाचे वातावरण असल्याचे यावेही नाखवा यांनी सांगितले. दरम्यान, मच्छिमारांचे प्रश्न तातडीने सोडवले नाहीत तर पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही मच्छिमार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

# लाडक्या बहिणींना ईकेवायसीसाठी ३१ मार्चपर्यंत संधी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी-प्रक्रिया पूर्ण केली असली तरी, काही लाभार्थींनी माहिती भरताना नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडल्याचे निदर्शनास आले आहे. विशेषतः कुटुंबातील सदस्य सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेत नियमित/कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत का किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत का, या बाबत चुकीची नोंद झाल्याची प्रकरणे आढळली आहेत.अशा लाभार्थी महिलांना त्यांच्या अर्जातील माहिती दुरुस्त करण्यासाठी ऑनलाईन माध्यमातून पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. ही सुधारणा करण्याची सुविधा दि. ३१ मार्चपर्यंत उपलब्ध राहणार असून याबाबतचा शासन निर्णय दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

या अनुषंगाने योजनेच्या पोर्टलवर आवश्यक तांत्रिक सुधारणा करण्यात आल्या आहेत. संबंधित लाभार्थी महिलांनी दिलेल्या कालावधीत आपली माहिती तपासून आवश्यक दुरुस्ती करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांनी केले आहे.

# कारमधून पळवली लाखोंची रोकड

। पनवेल । प्रतिनिधी ।

रस्त्यालगत उभ्या कारमधून ३ लाख ३० हजार चोरट्याने पळवले. पनवेल येथील केशव म्हात्रे हे मित्रासह जेवण करण्यासाठी सीबीडीत आले होते. ते कार रस्त्यालगत उभी करून हॉटेलमध्ये गेले. त्यांनी तीन लाख ३० हजारांची रोकड असलेली बॅग कारमध्ये ठेवलेली होती. काही वेळाने ते कारजवळ आले असता काच फोडून रोकड चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. याविरोधात पनवेल पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलीस या घटनेचा तपास करीत आहेत. चोरट्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी होत आहे.



# बामणगावमध्ये आरोग्य शिबीर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील बामणगावमधील ग्रामपंचायतीच्या आवारात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन शनिवारी (दि.७) करण्यात आले. उन्नती हॉस्पिटल आणि आयसीयू पनवेल, विक्रांत वार्डे यांचे विवा फाऊंडेशन आणि प्रतिक खारकर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर घेण्यात आले.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्ययोजनेंतर्गतघेण्यातआलेल्या या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आरोग्य तपासणीसह आयुष्यमान भारत योजनेचे ई-कार्ड नोंदणी, सर्व प्रकारच्या आजार व विकारांची प्राथमिक स्वरुपाची तपासणी, रक्तातील साखरेचे प्रमाण, रक्तदाब आदी तपासणी या शिबिराच्या माध्यमातून करण्यात आली. बामणगावमध्ये हे शिबीर भरविण्यात आले. या शिबिरात ७५हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. यातील दहा रुग्णांच्या मुतखड्याची शस्त्रक्रिया मोफत केली जाणार आहे. या शिबिरात उन्नती हॉस्पिटल आणि आयसीयू पनवेलचे डॉ. समाधान पाटील, श्रीकांत किल्लेकर, प्रतिक पानकर, प्रणिता भोईर, शीतल म्हात्रे, व्यास वराड, समरेश शेळके, सागर नागावकर, तेजेस पाटील, ऋषी थळे, अनिकेत ठाकूर, प्रतिक खारकर आदींचे योगदान मोलाचे राहिले आहे.

# सुधागड तालुक्यात पेट्रोलची टंचाई

। सुधागड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील सुधागड पालीमध्ये सध्या पेट्रोल टंचाईची गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, अनेकपेट्रोल पंपांवर पेट्रोलचा साठा संपल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरवाढ होण्याच्या अफवांमुळे नागरिकांनी अचानक मोठ्या प्रमाणावर पेट्रोल पंपांवर गर्दी केल्याने अल्पावधीतच इंधनाचा साठा संपल्याची माहिती समोर आली आहे.

तालुक्यातील अनेक पेट्रोल पंपांवर पेट्रोल पूर्णपणे संपले असून, काही ठिकाणी डिझेलचाही तुटवडा जाणवत आहे. परिणामी, अनेक वाहनचालकांना रिकाम्या टाकीमुळे प्रवासात अडथळे निर्माण होत आहेत. काही वाहनचालकांची वाहने रस्त्यातच बंद पडल्याच्या घटना घडल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे. दरम्यान, सुधागड पाली परिसरासह तालुक्यातील काही भागांत सध्या केवळ सीएनजी पंप सुरू असल्याने त्या पंपांवरही वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, श्री. समीर नेताजी पालकर, यांनी बिनशेती जमीन मिळकतीचे मालक, ग्रेसी डिसुझा यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे वांजळे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १७६/२३ | ३.७४.६० | ३७.४६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विक घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. ०९/०३/२०२६

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

# निवडक



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

## शिघ्रे येथून अभियानाला सुरूवात

**आगरदांडा :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान पहिल्या टप्प्या अंतर्गत मुरुड तालुक्यातील शिघ्रे येथे शनिवारी (दि.७) समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानाच्या अनुषंगाने गावोगावी जाऊन नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच, या शिबिरादरम्यान उपस्थित ग्रामस्थांकडून विविध शासकीय सेवांसाठी अर्ज स्वीकारण्यात आले व अनेक सेवांचा तात्काळ लाभ नागरिकांना देण्यात आला. या शिबिरामध्ये महसूल विभागामार्फत २६ उत्पन्नाचे दाखले, ३२ वय व अधिवास प्रमाणपत्र, ४३७ डिजिटल सातबारा, ३५८ डिजिटल ८'अ' उतारा, ३८ रेशन कार्ड, २१ आधार कार्ड अपडेट, १० संजय गांधी निराधार योजना लाभार्थी नोंदणी, १८ निवडणूक विभागाच्या सेवा फॉर्म क्र. ६ (नवीन मतदार नोंदणी, २० फॉर्म क्र. ७ (नाव वगळणे), व २९ फॉर्म क्र. ८ (दुरुस्ती/स्थलांतर) इत्यादी सेवा बजाविण्यात आल्या. यावेळी मुरुड तहसीलदार आदेश डफल, नायब तहसीलदार संजय तवर, नायब तहसीलदार कल्याण जळगावकर, नायब तहसीलदार राजश्री साळवी, शिघ्रे सरपंच गुलाब वाघमारे, उपसरपंच हाफीज कबले, सदस्य रुबीना, निलेश तांबडकर, तुकाराम पाटील आदिंसह ग्रामस्थ, मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल उपस्थित होते.



## पनवेलमध्ये अभियानाला प्रारंभ

**नवीन पनवेल :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक १ ची अंमलबजावणी करण्याकरता अपर तहसिल पनवेल यांच्या कार्यक्षेत्रात ७ मार्च ते ८ मे दरम्यान मंडळ स्तरावरती एकूण पाच शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्रथम शिबिर नेरे महसूल मंडळामध्ये शांतीवन आश्रमशाळा, वाकडी येथे ७ मार्च रोजी आयोजित करून अभियानाला सुरुवात करण्यात आली. शासकीय विभागाकडील अधिकारी यांनी आपापल्या विभागाकडील योजनांची माहिती या अभियानात देण्यात आली. तसेच स्टॉल लावून शासनाच्या विविध प्रकारचे दाखले व योजना नागरिकांना लाभ देण्याकरिता सोय उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी वाकडी गावच्या स्थानिक महिला बचत गटाच्या भगिनींनी पुढाकार घेवुन तेथे घरगुती मसाले व पापड यांचे स्टॉल लावून विक्रीसाठी तरतुद केली होती. या कार्यक्रमास शांतीवन संस्थेचे चेअरमन ॲड प्रमोद ठाकुर, नायब तहसिलदार सुनिल जाधव, संभाजी शेलार, संतोष पाटील, तसेच नेरे मंडळातील आजी, माजी सरपंच व सदस्य, पोलीस पाटील उपस्थित होते.



## शासनाच्या योजनांची माहिती

**बोर्लीपंचतन :** श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील श्री मोहनलाल सोनी विद्यालयात शनिवार (दि.७ मार्च) रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान' टप्पा क्र.१अंतर्गत समाधान शिबिराचा शुभारंभ श्रीवर्धनचे उपविभागीय अधिकारी महेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. या शिबिरामध्ये नागरिकांना विविध प्रशासकीय सेवा थेट उपलब्ध करून देण्यात आल्या. उत्पन्न, नॉन–क्रिमीलेयर व जात प्रमाणपत्र, सातबारा दुरुस्ती, प्रलंबित फेरफार, वारस नोंदी यांसारख्या महसुली कामांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. महेश पाटील यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांनी या अभियानाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,असे आवाहन केले. यावेळी मंडळ अधिकारी सुनील पाटील, कमलाकर गायकवाड, उपअधीक्षक भूमी अभिलेख सोमनाथ कोरके, निमतानदार भूमी अभिलेख प्रशांत जाधव, ग्राममसूल अधिकारी संदीप सोरे, रोहित मोरे, विक्रम चव्हाण, आदित्य धनावडे, सपना वायडे, प्रियांका देव्हारे, ग्रामपंचायत अधिकारी शंकर मयेकर, महसूल सेवक गणेश महाडिक, अस्मिता नागे, तसेच आपले सरकार सेतू केंद्र चालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## नागरिकांनी घेतला लाभ

**शिहू :** महसूल विभागामार्फत नागरिकांच्या प्रलंबित महसूल प्रश्नांचे जलद, पारदर्शक व गावपातळीवर निराकरण करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या पहिल्या टप्प्याची सुरूवात जय हनुमान मंदीर कासू येथे करण्यात आली. या दिवशी आपल्या तालुका/गावात महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित राहून एकाच ठिकाणी विविध सेवा तत्काळ उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, जमिनीच्या खरेदी–विक्री, वारसा, वाटप इत्यादींमुळे नोंद न झालेली फेरफार प्रकरणे तातडीने सोडविणे, सातबारा उताऱ्यात चुका दुरुस्ती नाव, क्षेत्रफळ, पिक नोंद, हक्क नोंद यामधील त्रुटी सुधारणा. डिजिटल स्वाक्षरीयुक्त ७/१२ उतारे कायदेशीर मान्यतेसाठी आवश्यक डिजिटल स्वाक्षरी असलेले सातबारा उतारे उपलब्ध करून देणे. ८–अ उताऱ्यांचे वाटप, जमिनीच्या मालकी व कर नोंदी संदर्भातील ८–अ दस्तऐवज वितरण, उत्पन्न/रहिवासी / जातीचे प्रमाणपत्र, शासकीय योजना, शिक्षण, नोकरनीसाठी आवश्यक दाखले तत्काळ देणे, नॉन–क्रिमीलेयर प्रमाणपत्र आरक्षण व शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्र, अकृषिकबाबत मार्गदर्शन व सुधारणा, जमिनीचा कृषी ते अकृषिक वापर बदल प्रक्रिया समजावून सांगणे,सनद प्रक्रियेची माहिती, जमिनीच्या कायदेशीर हक्कपत्राबाबत मार्गदर्शन, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे आदी गाव दप्तरातील सर्व जमीन नोंदी सुधारणा व अद्ययावत करणे इत्यादी होते. या शिबिराचा लाभ शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक यांनी मोठ्या प्रमाणात घेतला.

# छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

## खालापूर तालुक्यात जांबरुग येथून प्रारंभ



**| खोपोली | प्रतिनिधी |**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्रमांक.१ ची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यात दि.७ मार्च ते १५ मे दरम्यान मंडळ स्तरावर आयोजन करण्यात आले आहे. खालापुर तालुक्यातील जांबरुग येथील रा.जि.प शाळेत शनिवारी (दि.७) या अभियानाचा शुभारंभ तहसीलदार अभय चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी तहसीलदार अभय चव्हाण, उपअधीक्षक भूमी अभिलेख प्रमोद जरग, नायब तहसीलदार विकास पवार, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे, विस्तार अधिकारी विनोद चांदोरकर, जांबरूगचे सरपंच शिल्पा खांडेकर, बीडचे सरपंच भाऊ पवार, माजी सभापती मालती खांडेकर, माजी उपसरपंच सचिन तांडेल, मंडळ अधिकारी संदेश पानसरे, ग्राम महसूल अधिकारी सुवर्णा कोल्हे, सहाय्यक महसूल अधिकारी दिपाली पवार, महसूल सहाय्यक पल्लवी रामटेके, भूमी अभिलेख अधिकारी उत्तम केंद्रे, ग्रामपंचायत अधिकारी संतोष पवार आदींसह सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र, आधार कार्ड केंद्र चालक व इतर कृषी विभागातील कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

राज्यासह जिल्ह्यात महसूल मंडळ स्तरावर तसेच नगर परिषद व नगर पंचायत पातळीवर 'छत्रपती शिवाजी समाधान शिबीर अभियान टप्पा १'चे आयोजन दि.७ मार्च ते १५ मे या कालावधीमध्ये करण्यात आले आहे. सर्वसामान्य जनता व शेतकरी यांचे महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांशी संबंधित दैनंदिन प्रश्न सत्वर निकाली काढणे, महाराष्ट्र जमिन महसूल संहितेच्या नवीन तरतुदींची जनजागृती करणे/ प्रभावी अंमलबजावणी करणे, डिजिटल सेवांचा जास्तीत जास्त वापर सुनिश्चित करणे, नागरिकांना सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी द्वारा सेवा पुरविणे हा या अभियानाचा उद्देश आहे. त्यासाठी खालापूर तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रशासकीय विभागाकडील अधिकारी यांनी आपापल्या विभागाकडील योजनांची माहिती दिली. तसेच, स्टॉल लावून शासनाच्या विविध प्रकारचे दाखले व योजना नागरिकांना लाभ देण्याकरिता सोय उपलब्ध करून माहिती दिली.

> **सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभाग आणि इतर विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्न सोडवणे व जनतेच्या तक्रारी निकाली काढणे हा या शिबिरांचा मुख्य उद्देश आहे. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी या शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.**
>
> **– अभय चव्हाण, तहसीलदार, खालापुर**

### महसूल विभागाच्या सेवा

१. प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे
२. ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती
३. डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा
४. ८'अ' वाटप
५. उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी आदिवास प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र
६. नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
७. अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन व सुधारणा (४२ ते ४७) कलम सनद प्रक्रियेची माहिती
८. सामाजिक अर्थसहाय्य योजना लाभ मंजुरी
९. विद्यार्थ्यांना दाखले वाटप
१०. तुकडेबंदी कायदा सुधारणा
११. पानंद रस्ता
१२. सर्वांसाठी घरे पट्टेवाटप
१३. ॲग्रीस्टॅग नोंदणी
१४. पी एम किसान नोंदणी
१५. कमी जास्त पत्रक दप्तर अद्यावत

### भूमीअभिलेख यांच्याकडील सेवा

१. डिजिटल सेवांचा प्रसार व जनजागृती
२. नगर भूमापन गावठाण भूमापन व स्वामित्व अंतर्गत फेरफार प्रकरणे
३. भूसंपादन व अकृषीक प्रकरणात कमी जास्त पत्रक तयार करणे
४. ई मोजणी २.० प्रणाली
५. महाभुमी पोर्टल विषयी जनजागृती
६. तुकडे बंदी कायद्यामधील बदल बाबत माहिती
७. जनसंपर्क व प्रात्यक्षिक उपक्रम

## भूमीअभिलेख यांच्याकडून अभियानाला सुरुवात



**| रसायनी | प्रतिनिधी |**

भूमी अभिलेख खालापूर यांच्याकडून नागरिकांना वेळीच कागदपत्रे देण्याची व्यवस्था आणि महाराजस्व अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. त्यात सर्व नागरिक व शेतकऱ्यांना पेरणी, मशागत, शेतमाल वाहतूकीसाठी बारमाही शेतरस्ते देणारी योजना, माल पत्रक, मालमत्ता स्वाभिमान, इ–पीसीआयएस आणि स्वामित्व योजनेअंतर्गत डिजिटल मिळकत पत्रिका, एकत्र कुटुंबाचे जमिनीचे विभाजन करणेबाबत मोहीम, नोंदणीकृत वाटपपत्र/का.क. ८५ चे आदेश, २०० रुपयात पोट हिस्सा मोजणी, ७/१२ व नकाशा या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. जनतेने जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन भूमी अभिलेख खालापूर यांनी केले आहे. त्यासाठी भूमी अभिलेख उप अधीक्षक प्रमोद जरग, उत्तम केंद्रे, कार्यालयीन अधीक्षक समाधान पाटील, शिरस्तेदार भाऊसाहेब मुंडे, कैलास शेंडगे, अरविंद खांडेकर, उज्जन कोळेकर व भूकरमापक यांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

## डिकसळ येथे शिबिराचा शुभारंभ




**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील डिकसळ येथील प्रतीक्षा लॉन्सच्या सभागृहात प्रशासकीय भवनामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या शुभारंभ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभाचे उदघाटन जिल्हा परिषदेच्या सदस्या सुवर्णा ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार डॉ. जाधव यांनी केले. त्यानंतर प्रकाश संपकाळ यांनी, या शिबिरात महसूल विभागा बरोबरच कृषी विभाग, आरोग्य विभाग, भूमी अभिलेख, आदिवासी विभाग आदींचाही समावेश आहे. सातबाऱ्या बाबतच्या समस्या, विविध प्रकारचे दाखले, विद्यार्थ्यांना लागणारे दाखले, नवीन आधारकार्ड, आधारकार्ड मधील दुरुस्त्या, रेशनिंग कार्ड मधील बदल तसेच आदिवासी बांधवांच्या समस्या सोडविण्यावर भर देण्यात येत आहे. या पहिल्याच शिबिराला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. प्रत्येकाचे काम केले जाईल. शेवटच्या लाभार्थ्यांचे समाधान होईपर्यंत हे शिबीर सुरु असेल, असे स्पष्ट केले. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, भूमीअभिलेख अधिक्षक नितीन अटाळे, पंचायत समिती सदस्या नमिता श्रीखंडे, माजी सभापती प्रदीप ठाकरे, मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, सागर शेळके, लहू श्रीखंडे, समीर साळोखे, मुख्याध्यापक राजेंद्र बोराडे, दिनेश बोरसे, आसल सरपंच रमेश लदगे, पोलीस मित्र संघटनेचे ज्ञानेश्वर साळोखे, मंडल अधिकारी वैशाली पाटील, संतोष जांभळे, अशोक बनसोडे, शीतल मोरे, विश्वास गडदे, बाबासाहेब शेट्टे, किरण बेलोसकर, वैशाली मांटे, तलाठी मनीषा राऊत, आकाश काळे, संग्राम चव्हाण, वैशाली मांडे, शितल मंदाडे, पार्वती वाघ, प्रवीण चव्हाण, मनोहर वाघ आदींसह परिसरातील ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच, हे शिबीर १४ मार्च रोजी कडाव व खोपोली, २५ मार्च रोजी कळंब व वासांबे, १० एप्रिल रोजी नेरळ व चौक, १४ एप्रिल रोजी कर्जत व चौक, १७ एप्रिल रोजी कशेळे व वावोशी, १ मे रोजी नेरळ व वावोशी, ८ मे रोजी कर्जत व खालापूर आणि १५ मे रोजी पाथरज व खोपोली येथे आयोजित करण्यात येणार आहेत.

## कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर बैठक

**| पाली–बेणसे | प्रतिनिधी |**

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्यावतीने दि. २४ डिसेंबर, २०२५ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने नवी मुंबईतील विभागीय आयुक्त कोकण विभाग येथे शुक्रवारी (दि.६) विभागीय आयुक्तांच्या दालनात मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर बैठक आयोजित केली होती. या बैठकीमध्ये खालील विषयावर महत्वपूर्ण व सकारात्मक चर्चा झाली. या बैठकीमध्ये सुरेश तांबे, गणेश मडावी, सुमित भुईगळ, शिवाजी बीबराळे, गाडे, संजीव मोरे, राहुल सूर्यवंशी महसूल आदी उपस्थित होते.

## 'महसूल सेवा आता आपल्या दारी'

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यात मार्च ते मे या कालावधीत विविध ठिकाणी समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. तालुक्यातील बोर्लीपंचतन, वालवटी आणि श्रीवर्धन मंडळ या ठिकाणी ही शिबीरे आयोजित करण्यात येणार असून मोठ्या प्रमाणात नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. हे शिबीर ७ मार्च रोजी बोर्लीपंचतन येथे पार पडले असून १४ मार्च रोजी वालवटी, १० एप्रिल रोजी बोर्लीपंचतन, १७ एप्रिल रोजी वालवटी आणि ८ व १५ मे रोजी श्रीवर्धन येथे पार पडणार आहेत. या शिबिरांमध्ये नागरिकांना विविध महसूल सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामध्ये ७/१२ उतारे अद्यावत करणे व वितरण, प्रलंबित फेरफार नोंदींचे निराकरण, भोगवटादार वर्ग २ जमीन वर्ग १ मध्ये रूपांतरण तपासणी, तुकडेबंदी कायद्याशी संबंधित नोंदींची पडताळणी, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अर्ज व मंजुरी, विद्यार्थ्यांना आवश्यक दाखल्यांचे वितरण तसेच शासनाच्या 'सर्वांसाठी घर' योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना पट्टे वाटप, अशा विविध सेवांचा समावेश असणार आहे.

## महाराजस्व समाधान शिबिर

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव तालुक्यातील मंडळ लोणेरे अंतर्गत एस. एस. निकम हायस्कूल लोणेरे येथे शनिवारी (दि.७) महाराजस्व शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये माणगाव तालुक्यातील महसूल विभागामार्फत व इतर शासकीय विभागामार्फत त्यांच्याकडील सेवा नागरिकांना देण्यात आल्या. महसूल विभागामार्फत २४ उत्पन्नाचे दाखले, ११ वय अधिवास दाखले, ८ नॉनक्रिमिलेअर दाखले, ४० जातीचे दाखले वाटप करण्यात आले. तसेच, जिवंत ७/१२ अंतर्गत मयत व्यक्तीच्या वारसांची नोंद घेऊन व प्रलंबित फेरफार नोंदी निर्गत करून ३२ लाभार्थ्यांना शिबीर ठिकाणी डिजिटल ७/१२ व ८ अ वाटप करण्यात आले. त्याचबरोबर २९ फेरफार निकाल, १६ लाभार्थ्यांचे आधार दुरुस्ती व १ लाभार्थ्यांचे नवीन आधारकार्ड करीता नोंदणी, ३५ लाभार्थ्यांचे अँग्रोस्टॅक करीता ऑनलाईन मंजूरी, नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरिकांना अनुदान वाटपासाठी एकूण ४८ नागरिकांची ई–केवायसी पूर्ण, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत ७३ लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी, २७२ लाभार्थ्यांचे आयुष्मान भारतकार्ड साठी नोंदणी, पंचायत समिती कृषी विभागामार्फत २ लाभार्थ्यांना ताडपत्री वाटप व एकूण ३५ महिला लाभार्थ्यांना मोफत बायोगॅसचा वितरने वाटप करण्यात आले.

## महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी



**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका नगरसेविका मनिषा म्हात्रे यांच्या पुढाकाराने आणि डॉ. मंगेश डाके यांच्या सहकार्याने धाकटा खांदा येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होत. या शिबिराला शेकाप नेते माजी आमदार बाळाराम पाटील यांनी उपस्थित राहून उपक्रमाचे कौतुक केले. या शिबिरामध्ये परिसरातील अनेक महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आरोग्य तपासणी करून घेतली. महिलांच्या आरोग्याची नियमित तपासणी व्हावी आणि त्यांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. समाजात महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी असे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे परिसरातील नागरिकांनी स्वागत केले. शेवटी सर्व महिलांना आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

**४०० मशालींच्या प्रकाशाने गड ऊजळला | शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न**

# दासगावच्या दौलतगडावर मशाल महोत्सव

**| महाड | सुजित धाडवे |**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण जिल्ह्यात जल्लोषाचे वातावरण होते. ठिकठिकाणी महाराजांच्या पराक्रमाचे पोवाडे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाड तालुक्यातील दासगाव येथील दौलतगडावर शिवजयंतीनिमित्त ४०० मशाली पेटविण्यात आल्या होत्या. त्यामुळे गडाचा संपूर्ण परिसर उजळून निघाला होता.

दौलतगड प्रतिष्ठानच्यावतीने या किल्ल्याच्या संवर्धनासाठी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जात आहे. दरम्यान, शिवजयंती निमित्त शुक्रवारी (दि.६) रात्री ९.०० वाजता दौलतगडावर मशाली पेटवून फटाक्यांची आतिषबाजी करून मशाल महोत्सव साजरा झाला. यावेळी गडावर २०० मशाली लावून 'जाणता राजा' हे नाव तयार करण्यात आले होते. पहिल्या वर्षी १०० मशाली, दुसऱ्या वर्षी २५०, तिसऱ्या वर्षी ३५०, तर यंदा ४०० मशाली प्रज्वलित करण्यात आल्या. दौलत गड प्रतिष्ठान आणि रॉयल रायगडकर प्रतिष्ठानच्या सर्व दुर्गसेवकांच्या अथक परिश्रमाचे फळ म्हणजेच 'जागर दौलतगडाचा' हा मशाल महोत्सव आहे, असे निलेश निवाते यांनी सांगितले.




या सोहळ्यात दौलतगड भूषण पुरस्काराचे वितरणही करण्यात आले. यामध्ये गड संवर्धनासाठी कर्तव्य जाधव, क्रीडा क्षेत्रातील कबड्डी या खेळात अमर निवाते, कला क्षेत्रामध्ये सोहम नागवेकर, रांगोळी चित्रकला यामध्ये शैलेश निंबरे, क्रीडाक्षेत्र क्रिकेट यामध्ये अनुज निवाते आणि शैक्षणिक–वैद्यकीय क्षेत्रामध्ये डॉक्टर तन्वी मिंडे यांचा सन्मान करण्यात आला.

> रायगड किल्ल्याच्या सेवेसाठी तत्पर असलेला दौलतगड शासनाकडून दुर्लक्षित झाला आहे. शासनाला या किल्ल्यासंदर्भात जाग येण्यासाठी आम्ही हा कार्यक्रम सुरू केला आहे. हा कार्यक्रम करत असताना शासनाकडून या किल्ल्याच्या संवर्धनासाठी एकही रुपयाचा निधी प्राप्त झाला नाही. आम्ही या किल्ल्यासंदर्भात दरवर्षी अशीच प्रथा सुरू ठेवणार आहोत.
>
> – निलेश निवाते, संस्थापक अध्यक्ष, दौलतगड प्रतिष्ठान,

## नीतीशकुमार दिल्लीकडे

अखेर जे अपेक्षित ते झाले आहे. नीतीशकुमार हे मुख्यमंत्रिपद सोडणार हे निश्चित झाले आहे. त्यांनी राज्यसभेसाठी अर्ज दाखल केला असून राज्य सोडून त्यांनी दिल्लीला जावे याचा बंदोबस्त झाला आहे. आता गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये बिहारमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये आपण विक्रमी जागा घेऊन विजयी होऊ आणि नीतीश यांना बाजूला करू अशी स्वप्ने भाजपवाले पाहत होते. त्यासाठीच पुढचे मुख्यमंत्री नीतीश राहतील असे सांगण्याचे टाळले जात होते. प्रचारामध्ये नरेंद्र मोदी नीतीश यांचा उल्लेख न करता एनडीएला मतदान करा असे म्हणत होते. पण भाजपचे मनसुबे सफल झाले नाहीत. नीतीश यांच्या संयुक्त जनता दलाला ७५ आणि भाजपला ७९ अशा जागा मिळाल्या. त्यापूर्वीच्या निवडणुकीत हा फरक मोठा होता. पण जनता दलाने अनपेक्षितपणे आपली कामगिरी सुधारली. त्यामुळे मग नीतीश यांनाच मुख्यमंत्रिपदी ठेवणे अपरिहार्य झाले. त्यावेळी निकाल आल्यानंतर जवळपास तीन दिवस नीतीश पत्रकारांसमोरदेखील आले नव्हते. आपल्यालाच मुख्यमंत्री केले जाईल याचा खुंटा भाजपकडून हलवून बळकट केल्यानंतरच ते घराबाहेर आले होते. त्यावेळी भाजप नेतृत्वाने नाईलाजाने नीतीश यांनाच कायम ठेवले असले तरी त्यांना वर्षभरानंतर म्हणजे सप्टेंबरात बदलले जाईल अशी सर्रास चर्चा होती. प्रत्यक्षात ते आधीच घडले आहे. मधल्या काळात नीतीश यांनी पुन्हा राज्यावर आपली पकड बसवायला सुरुवात केली होती. जनता दल व भाजप यांच्यातला जागांचा फरक फार नसल्याने भाजपला का नेतेपद द्यायचे अशी भावना तयार होऊ लागली होती. ती वाढीला लागण्याचा धोका दिसू लागल्याने भाजपच्या केंद्रीय नेत्यांनी हालचाली केलेल्या दिसतात. त्यानुसार नीतीश यांनी राज्यसभेवर जावे व भाजपचा मुख्यमंत्री नियुक्त व्हावा असा समझोता मंजूर करून घेण्यात आला. अर्थात, हा तह शेवटापर्यंत कसा जातो हे पाहणे मनोरंजक ठरेल. नीतीश यांनी राजीनामा देऊन दिल्लीत जाण्याला त्यांच्याच पक्षातील बहुसंख्य नेत्यांचा विरोध होता. एकदा का भाजपच्या हातात सत्ता गेली की जनता दलाच्या पंखांना कात्री लावली जाईल अशी साधार भीती त्यांना वाटते. महाराष्ट्रात शिवसेनेच्या बाबतीत हेच घडलेले त्यांनी पाहिलेले आहे.

### महागुरू

नीतीशकुमार यांची प्रकृती हा सर्वांच्या चिंतेचा विषय होता. सार्वजनिक ठिकाणी नीतीश हे अनेकदा अतिशय असंबध्द बोलत होते व एखाद्या लहान मुलासारखे वागत होते. अलिकडेच एका मुस्लिम मुलीचा हिजाब दूर करण्याचा प्रयत्न करून त्यांनी वाद ओढवून घेतला होता. त्यामुळे नीतीश हे फार काळ राहिले असते तर त्यातून आणखी भानगडी होण्याचा धोका होता. याला पर्याय म्हणून नीतीश यांचे पुत्र निशांत यांना राजकारणात आणण्याचा चंग कार्यकर्त्यांनी बांधला होता. निशांत हे उच्चशिक्षित आहेत. मात्र राजकारणात आजवर त्यांना फारसा रस नव्हता. कॉलेजात असताना दोन-तीन वर्षे ते नीतीश यांचे चिरंजीव आहेत हेही अनेकांना ठाऊक नव्हते. खुद्द नीतीश हेही आपल्या घरातील कोणा व्यक्तीला राजकारणात आपल्या जागी आणायला उत्सुक नव्हते. कारण, आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींच्या व नंतरच्या काळात लालूप्रसाद यादव यांच्या घराणेशाहीला त्यांनी नेहमीच कडाडून विरोध केला होता. पण आज निशांत मुख्य पदी नसतील तर जनता दलामध्ये निर्नायकी निर्माण होऊन फाटाफूट होऊ शकते. ते लक्षात घेऊन त्यांना या तडजोडीला मान्यता देणे भाग पडले. दुसरे म्हणजे नीतीश खासदार म्हणून काम करताना निशांतला मार्गदर्शन करू शकतात. अशा रीतीने तूर्तास जनता दलाच्या हातातून बिहारचे राज्य जाणार असले तरी दीर्घ काळात निशांत यांच्या नेतृत्वाखाली जनता एक राहून पुन्हा मोठी कामगिरी करू शकतो. अर्थात, निशांत किती राजकीय चातुर्य व धडाडी दाखवतात यावर हे अवलंबून आहे. कारण, त्यांची गाठ भाजपशी आहे. मोदी व शाह यांचा भाजप हा अत्यंत पाताळयंत्री पक्ष आहे. महाराष्ट्रात तो एकाच वेळी शिवसेना व राष्ट्रवादीच्या संपर्कात होता हे उघड झाले. अर्थात, नीतीश या सर्वांचे बारसे जेवलेले आहेत. खुद्द त्यांनी आजवर भाजपला इतक्या वेळा गचांडी देऊन पुन्हा त्याचाच हात पकडला आहे की ते याबाबतीतले महागुरु आहेत. पण ते मुख्यमंत्रिपदावरून गेले की जनता दलाला ओहोटी लागणार हे निश्चित आहे.


### तेजस्वी यांना संधी

नीतीश यांच्या दिल्लीत जाण्यामुळे भाजपला हिंदी पट्ट्यातल्या आणखी एका राज्यावर कबजा करता येणार आहे. तूर्तास त्यांना जनता दलासोबत जुळवून घ्यावे लागणार असले तरी त्याचे पाय कसे कापायचे याचे मार्गदर्शन दिल्लीतून होईलच. निशांतकुमार किंवा अन्य नेत्यांना जम बसवायला वेळ लागेल. या अवधीत भाजप अगदी जनता दलातही फोडाफोडी देखील करू शकेल. अर्थात, भाजपकडे नीतीश यांच्या तोडीचा नेता बिहारमध्ये नाही ही मोठी उणीव आहे. सध्याचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्यावर अनेक गंभीर आरोप आहेत. शिवाय ते एकट्याच्या बळावर भाजपचे तारु खेचू शकत नाहीत. अर्थात केंद्राला असाच आपल्या हातातला बाहुला नेता सर्व राज्यांमध्ये हवा असतो. आदित्यनाथ किंवा देवेंद्र फडणवीस यांनी मोठे होणे हे केंद्रीय नेत्यांना सर्वस्वी मान्य असतेच असे नाही. आदित्यनाथांना त्यांच्याच मंत्रिमंडळातील उपमुख्यमंत्री व काही मंत्री छुपा विरोध करीत असतात. योगींचे सर्व राजकारण ठाकूरांना झुकते माप देणारे व ब्राह्मणांच्या विरोधातले आहे अशी भावना तेथे तयार झाली आहे. मायावती व अखिलेश हे विरोधक त्या भावनेला हात घालू पाहत आहेत. बिहारमध्ये भाजपचा वारू लालूप्रसाद यादवांच्या जनता दलाने वारंवार अडवलेला दिसतो. गेल्या वर्षीदेखील तेजस्वी यादव यांच्या सभांना मोठी गर्दी होत होती. त्यामुळे राजद सत्तेत येईल असे वाटत होते. पण महिलांना सरसकट दहा हजार रुपये वाटण्याच्या नीतीश यांच्या योजनेने सर्व पारडे फिरवले. शिवाय, मतदान व मोजणीत काही गडबडी झाल्या असाव्यात असेही आरोप आहेतच. सारांश, गुजरात किंवा मध्य प्रदेशात भाजप जसा मजबूत स्थितीत आहे तसा तो बिहारमध्ये नाही. जनता दलाची मदत नसती तर भाजपला इतकी मजल मारता आली नसती. भाजपने अलिकडेच बिहारमध्ये साधे मंत्री असलेल्या नितीन नबीन या तरुण नेत्यांना राष्ट्रीय अध्यक्ष केले. नीतीश यांच्यासोबत नितीन हेही राज्यसभेत जातील. ते आपल्या गृहराज्यात काय पराक्रम करतात याकडे सर्वांचे लक्ष असेल. दुसऱ्या बाजूने नीतीश यांच्यावर आता राज्यकारभाराची जबाबदारी नसल्याने कदाचित ते पक्षाला अधिक वेळ देऊ शकतील. कदाचित केंद्रातील एखादे मंत्रिपदही त्यांच्या वाट्याला येऊ शकते. त्याद्वारे ते आपला पक्ष कसा वाढवतात हे पाहावे लागेल. हा सत्ताबदल ही तेजस्वी यादव यांच्यासाठी चांगली संधी आहे. भाजपचे नवे सत्ताधीश अननुभवी असतील. त्यांच्या विरोधात रान उठवून आपला पक्ष मजबूत करण्याचा अवसर त्यांना मिळू शकेल.

**विचार**

# ट्रम्प यांना आणखी एक थप्पड

***पन्नास टक्के आयात शुल्क. चाबहार बंदराच्या कामात खोडा, 'एच-वन बी' व्हिसासाठी अव्वाच्या सव्वा शुल्क अशा निर्णयांद्वारे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. मात्र १४५ कोटींची बाजारपेठ आणि देशांतर्गत खपाचे प्रचंड प्रमाण असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला हलवणे ट्रम्पना शक्य नाही. ट्रम्प नीतीचा थोडाबहुत परिणाम होईल; परंतु भारताच्या आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक मजबूत पाऊल पडेल.***



**महेश जोशी**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक शुल्क धोरणाला तिथल्या सर्वोच्च न्यायालयाच्या पीठातील न्यायाधीशांनी ६-३ बहुमताने बेकायदेशीर ठरवत स्पष्ट संदेश दिला आहे. राष्ट्रीय आणीबाणीच्या नावाखाली अमर्यादित आर्थिक अधिकार गृहीत धरता येत नाहीत, असे न्यायालयाने बजावले. ट्रम्प प्रशासनाने १९७७ च्या 'इंटरनॅशनल इमर्जन्सी इकॉनॉमिक पॉवर्स ॲक्ट' (आयईईपीए) चा आधार घेत शंभराहून अधिक देशांवर १० ते ५० टक्क्यांपर्यंत शुल्क लादले. या कायद्यात 'कर' किंवा 'टॅरिफ' असा स्पष्ट उल्लेख नसतानाही त्याचा व्यापक अर्थ लावत कार्यकारी सत्तेचा विस्तार करण्याचा प्रयत्न झाला. मुख्य न्यायाधीश जॉन रॉबर्टस् यांनी आपल्या निर्णयात नमूद केले, की कर लादण्याचा अधिकार हा मूलत: काँग्रेसचा आहे. अध्यक्षांना इतके व्यापक अधिकार हवे असतील, तर त्यासाठी संसदेची मान्यता आवश्यक आहे. अमेरिकन काँग्रेसची म्हणजे तिथल्या संसदेची मान्यता न घेताच ट्रम्प यांनी मनाला येईल तेव्हा आणि मनाला येईल तसे आयात कर लादले. या करांना अमेरिकन जनतेचा तसेच तिथल्या अर्थतज्ज्ञांचा विरोध होता; परंतु अंगी हुकूमशाही प्रवृत्ती पुरेपूर भिनलेल्या ट्रम्प यांनी कुणालाही जुमानले नाही. ट्रम्प यांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय केवळ कायदेशीर वादापुरता मर्यादित नाही. त्याचे आर्थिक आणि राजनैतिक परिणाम दूरगामी असू शकतात. अंदाजे १७५ अब्ज डॉलर्स इतक्या शुल्काची परतफेड करण्याची वेळ अमेरिकन सरकारवर येऊ शकते. आयातदार कंपन्या आधीच न्यायालयीन मार्गाचा अवलंब करत आहेत. जर परतफेडीची प्रक्रिया सुरू झाली, तर त्याचा ताण अमेरिकेच्या अर्थसंकल्पावर पडू शकतो.

ग्राहकांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरू शकतो. आयात वस्तूंवरील जादा शुल्क हटल्यास अनेक उत्पादने स्वस्त होण्याची शक्यता आहे. जागतिक बाजारपेठेतही स्थैर्य येऊ शकते. व्यापार युद्धाची भीती कमी होणे हे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक पाऊल आहे. भारताच्या दृष्टीने पाहिले, तर हा निर्णय संधीचे दार उघडणारा आहे. अमेरिका ही भारताची सर्वात मोठी निर्यात बाजारपेठ आहे. कापड, रत्ने-दागिने, सागरी उत्पादने, रसायने आणि ऑटो पार्ट्स यांसारख्या क्षेत्रांना नवसंजीवनी मिळू शकते. भारतीय वस्तू अमेरिकेत स्वस्त झाल्यास निर्यात वाढेल. रोजगारनिर्मितीला चालना मिळेल आणि रुपयावरील दबाव कमी होऊ शकतो; मात्र राष्ट्रीय सुरक्षेच्या तरतुदींतर्गत लादलेले काही शुल्क अद्याप कायम राहू शकतात, ही बाब लक्षात घ्यावी लागेल. ट्रम्प प्रशासनासाठी हा निकाल राजकीय आणि धोरणात्मक दोन्ही आघाड्यांवर आव्हानात्मक आहे. 'अमेरिका फर्स्ट' या घोषणेला आर्थिक राष्ट्रवादाची धार देताना त्यांनी कार्यकारी सत्तेचा विस्तार साधण्याचा केलेला प्रयत्न न्यायालयाने मर्यादित केला आहे. आता पुढील पाऊल काँग्रेसच्या भूमिकेवर अवलंबून असेल. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय एका मूलभूत तत्त्वाची आठवण करून देतो. लोकशाही व्यवस्थेत कोणतीही सत्ता अमर्यादित नसते. आर्थिक धोरणे कितीही लोकप्रिय किंवा आक्रमक असली, तरी घटनात्मक चौकटीतच राबवावी लागतात. अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा संदेश केवळ फक्त अमेरिकेपुरता मर्यादित नाही, तर संपूर्ण जगासाठी लोकशाही संस्थांच्या सामर्थ्याचा पुनरुच्चार आहे.

कर लादण्याचा मूलभूत अधिकार काँग्रेसचा आहे. संविधानानुसार महसूलविषयक अधिकार संसदेसाठी राखून ठेवलेले आहेत. त्यामुळे कार्यकारी आदेशाद्वारे अमर्यादित शुल्क लादणे घटनात्मक चौकटीच्या बाहेर जाते. न्यायालयाच्या मते राष्ट्रीय आणीबाणी ही संज्ञा सत्तेच्या अमर्याद विस्ताराचे साधन ठरू शकत नाही. या निर्णयाचे तात्काळ आणि दीर्घकालीन आर्थिक परिणाम महत्त्वाचे असतील. अंदाजे १७५ अब्ज डॉलर्स इतका महसूल या शुल्काद्वारे गोळा करण्यात आला होता. आता कंपन्या परतफेडीची मागणी करू शकतात. मोठ्या प्रमाणावर परतावा द्यावा लागल्यास अमेरिकन अर्थसंकल्पावर ताण येऊ शकतो. दुसरीकडे, आयात वस्तूंवरील जादा शुल्क हटल्यास ग्राहकांना दिलासा मिळेल. इलेक्ट्रॉनिक्स, वस्त्र, वाहनांचे सुटे भाग, गृहोपयोगी वस्तू यांच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे. महागाईवरही सकारात्मक परिणाम होऊ शकतो. व्यापारयुद्धाची भीती कमी झाल्यास बाजारपेठेत स्थैर्य येईल आणि गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढेल. ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' या धोरणामुळे गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक व्यापार व्यवस्थेत अनिश्चितता निर्माण झाली होती. चीन, कॅनडा, मेक्सिको, भारत आणि युरोपीय देशांसोबत तणाव वाढला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे हा तणाव काही प्रमाणात कमी होऊ शकतो. जागतिक व्यापार संघटना आणि मुक्त व्यापाराच्या तत्त्वांना या निर्णयामुळे बळ मिळेल. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थैर्य आणि पूर्वानुमानता (प्रेडिक्टिबिलीटी) वाढेल. ते गुंतवणुकीसाठी अत्यावश्यक असते. व्यापारावर राजकीय दबावाऐवजी कायदेशीर चौकट महत्त्वाची आहे, हा संदेश या निर्णयातून जगाला मिळाला आहे.

अमेरिका ही भारताची सर्वात मोठी निर्यात बाजारपेठ आहे. जादा शुल्कामुळे कापड, रत्ने-दागिने, चामडे, सागरी उत्पादने, रसायने आणि ऑटो पार्टस या क्षेत्रांना मोठा फटका बसला होता. आता हे शुल्क रद्द झाल्याने भारतीय वस्तू अमेरिकेत अधिक स्पर्धात्मक दरात उपलब्ध होतील. यामुळे निर्यात वाढू शकते, रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते आणि परकीय चलनसाठ्यात भर पडू शकते. परिणामी, रुपयावरील दबाव कमी होण्याची शक्यता आहे. याशिवाय आधी भरलेल्या शुल्कांच्या परतफेडीचा प्रश्नही भारतीय कंपन्यांसाठी महत्त्वाचा ठरेल. हा निर्णय संधी देणारा असला, तरी त्याचा पूर्ण लाभ घेण्यासाठी स्पर्धात्मकता, गुणवत्ता आणि पुरवठा साखळी मजबूत करणे गरजेचे आहे. हा निर्णय ट्रम्प यांच्या राजकीय प्रतिमेसाठी मोठे आव्हान आहे. त्यांच्या आर्थिक राष्ट्रवादाच्या भूमिकेला न्यायालयाने मर्यादा घातली आहे. समर्थकांसाठी हे 'न्यायिक हस्तक्षेप' वाटू शकते, तर टीकाकारांसाठी हा घटनात्मक संतुलनाचा विजय आहे. ट्रम्प यांच्यासमोर आता दोन पर्याय आहेत, ते म्हणजे काँग्रेसमार्फत स्पष्ट कायदेशीर अधिकार मिळवणे किंवा इतर विद्यमान कायद्यांच्या मर्यादेत राहून धोरण आखणे. कोणताही मार्ग निवडला, तरी त्यांना न्यायालयाच्या चौकटीचा सन्मान करावा लागेल. हा निर्णय केवळ शुल्क रद्द करण्यापुरता मर्यादित नाही. तो लोकशाही व्यवस्थेतील संतुलन आणि नियंत्रण यंत्रणेचे महत्त्व अधोरेखित करतो. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे, की कोणतीही सत्ता कितीही शक्तिशाली असली, तरी घटनात्मक मर्यादांच्या पलीकडे जाऊ शकत नाही.

अमेरिकेसाठी हा आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. जगासाठी हा स्थैर्याचा संकेत आहे आणि भारतासाठी ही आर्थिक संधी आहे. ट्रम्प यांच्या कर लादण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले, तेव्हा प्रशासनाने म्हटले होते, की सर्वोच्च न्यायालयात पराभव झाल्यास, सरकारला इतर देशांसोबतचे व्यापार करार मागे घेण्यास आणि आयातदारांना भरीव परतावा देण्यास भाग पाडले जाऊ शकते. शंभरहून अधिक देशांवर कर लादताना ट्रम्प यांनी सांगितले, की अमेरिकेतील व्यापार तूट कमी करणे आणि उत्पादन वाढवणे हे त्यांचे ध्येय आहे. तेव्हापासून त्यांनी महसूल वाढवण्यासाठी आणि व्यापार वाटाघाटींमध्ये इतर देशांवर दबाव आणण्यासाठी या शुल्कांचा वापर केला आहे. शैक्षणिक खेळणी कंपनी आणि वाइन आयातदारासह डझनभर राज्ये आणि लहान व्यवसायांच्या गटाने या शुल्कांविरुद्ध खटला दाखल केला. ट्रम्प यांनी शुल्क लादण्याच्या काँग्रेसच्या संवैधानिक अधिकारात बेकायदेशीरपणे हस्तक्षेप केला आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला. आयात केलेल्या वस्तूंवर अवलंबून असलेल्या या व्यवसायांनी न्यायालयात युक्तिवाद केला, की शुल्कामुळे त्यांचे कामकाज विस्कळीत झाले, ग्राहकांसाठी किंमती वाढल्या आणि कामगार कपात करण्यास भाग पाडले. सॉलिसिटर जनरलने न्यायमूर्तींना इशारा दिला, की आणीबाणीच्या अधिकारांचे नुकसान अर्थव्यवस्थेला महामंदीसारखे विनाश तसेच व्यापार वाटाघाटींमध्ये व्यत्यय आणि राजनैतिक पेच निर्माण करू शकते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, बेकायदेशीरपणे लादलेले हे कर रद्द होतील. अमेरिकेच्या सीमाशुल्क आणि सीमा संरक्षण विभागाला हे कर लावणे थांबवावे लागतील, तर या करांशी संबंधित अंमलबजावणीच्या कृती निलंबित किंवा पूर्णपणे रद्द केल्या जाऊ शकतात. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणाला मोठा धक्का मानला जाऊ शकतो. या निर्णयामुळे भारत आणि चीनसारख्या प्रमुख देशांसह अमेरिकेच्या इतर व्यापारी भागीदारांना महत्त्वपूर्ण दिलासा देऊ शकतो. या निर्णयामुळे जागतिक बाजारपेठ स्थिर होऊ शकते आणि व्यापार युद्ध रोखता येऊ शकते. ट्रम्प कार्यकारी आदेशाद्वारे न्यायालयाचा निर्णय रद्द करू शकत नाहीत. जर त्यांनी असे करणे असंवैधानिक मानले जाईल आणि त्यांना आणखी अडचणींना सामोरे जावे लागेल.

**चर्चा आजची**

# स्त्रियांच्या हक्कासाठी अजूनही लढा सुरूच ...

**वैष्णवी वाडकर**

जगभरात ८ मार्चला मोठ्या उत्साहाने महिला दिन साजरा करण्यात आला. जगभर महिला दिन हा स्त्रियांच्या सन्मान, हक्क आणि समान संधी देण्याचा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. महिला दिनाच्या निमित्ताने शहरांपासून खेड्यापाड्यांपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. समाजातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना सन्मानित करण्यात आले व त्यांच्या समाजातील योगदानाची दखल घेण्यात आली. मात्र, हे सगळं फक्त एका दिवसापुरतं असून अजूनही देशातील स्त्रियांना आपल्या सुरक्षिततेसाठी व विविध हक्कांसाठी लढा द्यावा लागत आहे, अशी चर्चा सुरू आहे.

आज स्त्रिया शिक्षण, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान, कला, राजकारण अशा अनेक क्षेत्रांत प्रगती करत आहेत. उच्च शिक्षण घेऊन समाजात स्वतःची ओळख निर्माण करण्याचा त्या प्रयत्न करत आहेत. या पुरुषप्रधान देशात त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून समाजात काम करत आहेत. कोणत्याही क्षेत्रात मागे न राहता विविध गोष्टींचे ज्ञान घेऊन आणि विचारपूर्वक अभ्यास करून महिला आपला मार्ग स्वतः तयार करत आहेत. पूर्वी महिलांचे काम म्हणजे फक्त 'चूल आणि मूल' असा समज होता. पण याच 'चूल आणि मूल' संकल्पनेतून महिलांनी स्वतंत्र होण्याचा मार्ग तयार केला. त्याच चुलीवर पापड, चकल्या, मसाले, घरगुती जेवण बनवून स्त्रियांनी गृहउद्योग करण्यास सुरुवात केली. खरंतर या गृहउद्योगातूनच महिलांना आणखी काहीतरी नवीन करण्याची प्रेरणा मिळत गेली. गृहउद्योग करता करता घरोघरी महिला उद्योजिका तयार झाल्या आणि आज आपण पाहतो की मोठंमोठे मसाला व्यवसाय, साड्यांचे व्यवसाय, हॉटेल्स व अनेक सौंदर्य उत्पादनांचे व्यवसाय महिला चालवत आहेत. त्यानंतर भारतात महिला वैज्ञानिक, महिला उप मुख्यमंत्री आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर



क्रीडापटूंनी समाजाला प्रेरणा दिली आहे. स्त्रियांनी अनेक क्षेत्रांत आपले नाव उंचावले आणि समाजात प्रेरणा निर्माण केली आहे. त्यामुळे वेळोवेळी स्त्रियांनी दाखवून दिले आहे की संधी मिळाली तर त्या संधीचा पुरेपूर उपयोग करू शकतात.

मात्र, आज स्त्रिया सक्षम असल्या तरी त्यांचा सन्मान आणि सत्कार हा केवळ महिला दिनापुरताच मर्यादित असल्याचे वास्तव आहे. आज स्त्रियांनी अनेक क्षेत्रांत प्रगती केली असली तरीही समाजात त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. बलात्कार, घरगुती हिंसाचार, स्त्रीभ्रूण हत्या, मानसिक व शारीरिक छळ अशा अनेक घटना आपल्या देशात मिनिटामिनिटाला घडत आहेत. नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालानुसार २०१६ साली देशात महिलांशी संबंधित ३ लाख ३८ हजार ९५४ गुन्हे दाखल झाले होते. त्यामध्ये ३८ हजार ९४७ बलात्काराच्या घटना आणि ८४ हजार ७४६ विनयभंगाच्या घटनांची नोंद होती. त्यापैकी सुमारे ८९ टक्के महिला अत्याचाराचे गुन्हे प्रलंबित होते आणि केवळ १८.९ टक्के गुन्हेगारांना शिक्षा देण्यात आली होती. तर २०२५ मध्ये सादर केलेल्या आर्थिक पाहणी अहवालानुसार २०२४ साली महाराष्ट्र राज्यात महिलांवरील अत्याचाराचे ४६ हजार ४५९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. ही आकडेवारी नुसती चिंता वाढवणारी नाही, तर स्त्रियांच्या सुरक्षिततेविषयी मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. दिवसेंदिवस महिलांसंबंधी गुन्ह्यांमध्ये घट होण्याऐवजी वाढ होताना दिसत आहे.

या सर्व अहवालांतून दिसून येते की हिंसा, लैंगिक अत्याचार, आर्थिक असमानता, अपुऱ्या आरोग्य व शिक्षण सुविधांमुळे समाजातील स्त्रियांना आज अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अजूनही महिला आपल्या हक्कांसाठी संघर्ष करताना दिसतात. या महिला दिनाच्या निमित्ताने स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि भेदभाव थांबवण्यासाठी प्रत्यक्ष बदल होणे गरजेचे आहे, याची जाणीव करून देणे महत्त्वाचे ठरत आहे. महिला दिन फक्त साजरा करण्यासाठी नसून खऱ्या अर्थाने जागरूकता निर्माण करण्यासाठी आहे. फक्त एक दिवसापुरता महिलांचा सन्मान आणि आदर न करता प्रत्येक दिवशी त्यांचा आदर करून त्यांना सुरक्षित असल्याची खात्री देण्याचा संदेश महिलांकडून समाजाला दिला जात आहे. असे झाले तरच देशातील महिलांसंदर्भातील वाढते गुन्हे कमी होतील आणि महिला खऱ्या अर्थाने सुरक्षित राहतील.

या महिला दिनी आपण फक्त गुलाब किंवा शुभेच्छा न देता स्त्रियांच्या हक्कांसाठी आणि सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य मानले पाहिजे. समाजात समानता आणि न्याय निर्माण करण्यासाठी पुरुष आणि स्त्रिया यांनी एकत्र काम करणे गरजेचे आहे. समाजाच्या प्रगतीसाठी स्त्रिया केवळ योगदान देत नाहीत, तर त्या समाजाच्या आधारस्तंभ आहेत. स्त्रियांचा सन्मान करणे आणि त्यांना समान संधी देणे हे समाजातील प्रत्येक सदस्याचे कर्तव्य आहे.

**लोकसंसद**

## द्विधा मनस्थितीत पालक

सोशल मीडियाचे लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी कर्नाटक आणि आंध्र प्रदेश सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी जाहीर करण्यात आली आहे. आंध्र प्रदेशात येत्या ९० दिवसांत १३ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात येणार आहे. विशेषतः लहान मुलांनी कृत्रिम प्रज्ञा आणि सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर करावा यासाठी उपाययोजना करण्याबाबत दोन्ही राज्य सरकारे सल्लामसलत करत आहेत. पालकवर्गाकडून या निर्णयाचे स्वागत होत असले, तरी त्याची अंमलबजावणी कितपत होईल याबद्दल साशंकता व्यक्त करण्यात येत आहे. आजकाल अनेक शाळा आणि कॉलेजांमध्ये मोबाईल किंवा टॅबच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. त्यासाठी विविध ॲप्सचा वापर केला जातो. अशा परिस्थितीत शैक्षणिक ॲप्स आणि सोशल मीडियाचा वापर नियंत्रित करणे अत्यंत आव्हानात्मक ठरणार आहे. ऑनलाईन पॉर्नोग्राफी, सायबरबुलिंग, ऑनलाईन फसवणूक आणि इंटरनेट व्यसन यांसारखे धोके वाढल्यामुळे असा निर्णय घेण्यात आला आहे. कर्नाटकने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया बंदीची घोषणा केल्यानंतर मेटा प्लॅटफॉर्म या सोशल मीडिया कंपनीने सावधगिरीचा इशारा दिला आहे. अशा निर्बंधांचा विचार करणाऱ्या सरकारांनी किशोरवयीन मुलांची पावले कमी सुरक्षित आणि अनियंत्रित वेबसाइट्सकडे वळणार नाहीत ना? याची काळजी घ्यावी, असा सल्ला देण्यात आला आहे. एकूणच, या निर्णयामुळे पालकांची मनस्थिती द्विधा झालेली दिसून येते.

**– दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

**दिनविशेष**

# युरी गागारिनची प्रेरणादायी आणि भावनिक गाथा

युरी गागारिनची अंतराळवीर बनण्याची कथा त्याच्या संघर्षाची आणि उत्कटतेची सांगते. युरी अलेक्सेविच गागारिन यांचा जन्म ९ मार्च १९३४ रोजी तत्कालीन सोव्हिएत युनियन मध्ये झाला. स्मोलेन्स्क ओब्लास्टमधील क्लुशिनो गावातील रहिवासी, त्याच्या पालकांच्या चार मुलांपैकी तो तिसरा होता. त्याचे वडील दुग्धव्यवसायाचे काम करत होते. पहिल्या वर्षी शिकण्यासाठी तो शाळेत गेला तेव्हा दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि त्याची शाळा जर्मन सैनिकांनी जाळली. हे गाव जर्मन सैनिकांनी ताब्यात घेतले. यामुळे युरी आणि त्याच्या कुटुंबाला खूप यातना सहन कराव्या लागल्या. असे म्हणतात की जेव्हा त्यांचे गाव पुन्हा रशियाच्या ताब्यात आले तेव्हा त्यांना बराच काळ रुग्णालयात राहावे लागले.

शिक्षकांमुळे विमानांबद्दलची आवड निर्माण झाली : हे वर्ष १९४६ होते, युरीचे कुटुंब गझात्स्क येथे गेले, जिथे त्याने पुढील शिक्षण घेतले. शाळेत युरीला गणित आणि विज्ञान शिकवणारे शिक्षक विमानाचे पायलट होते. त्यांच्यामुळे युरीची विमानांबद्दलची आवड जागृत होऊ लागली. दरम्यान, त्यांच्या गावात एक लढाऊ विमान कोसळल्याने त्यांची उत्सुकता आणखीनच वाढली. या स्वारस्यामुळे, युरीला त्याच्या शाळेच्या गटात समाविष्ट केले गेले, ज्याने विमानाचे मॉडेल बनवले.

जेव्हा युरी फक्त १६ वर्षांचा होता, तेव्हा त्याला मॉस्कोजवळील ल्युबर्ट्सी स्टील प्लांटमध्ये फाउंड्रीमॅन म्हणून शिकाऊ उमेदवारी मिळाली. यासोबतच त्यांनी पुढील शिक्षणही सुरू ठेवले. यावेळी त्यांनी स्थानिक फ्लाइंग क्लबमधून सोव्हिएत एअर कॅडेट म्हणून प्रशिक्षणही घेतले. या प्रशिक्षणादरम्यान युरीने बायपोलर आणि याकोव्हलोव्ह याव-१८ उडवायला शिकले. १९५५ मध्ये, युरी गागारिनने ओरेनबर्गमधील चेकालोव्स्की हायर एअर फोर्स पायलट स्कूलमध्ये प्रवेश घेतला. पुढच्याच वर्षी तो मिग-१५ उडवण्याच्या प्रशिक्षणात सामील झाला. या वेळी दोनदा नापास झाल्यास प्रशिक्षणातून बाहेर फेकले जाईल, अशी भीती त्याला वाटू लागली. तथापि, त्यांनी हार मानली नाही आणि प्रशिक्षकांच्या मदतीने त्यांना अखेर यश मिळाले आणि १९५७ मध्ये त्यांनी एकट्याने उड्डाण करण्यास सुरुवात केली. मिग-१५ च्या यशस्वी उड्डाणानंतर, युरी यांना १९५७ मध्येच सोव्हिएत युनियन हवाई दलात लेफ्टनंट पद मिळाले. त्याने १६६ तास, ४७ मिनिटे उड्डाणाचा अनुभवही मिळवला. यानंतर तो नॉर्वेच्या सीमेजवळ तैनात झाला. दोनच वर्षांनंतर, जेव्हा रशियाचे लुना-३ उड्डाण यशस्वी झाले, तेव्हा अवकाश संशोधन कार्यक्रमात उत्तर प्रदेशची आवड जागृत होऊ लागली. हे पाहून त्याची सोव्हिएत अवकाश कार्यक्रमासाठी निवड झाली. १९५९ मध्ये, गॅगारिन यांना वरिष्ठ लेफ्टनंट बनवण्यात आले. वैद्यकीय आणि इतर कठोर चाचण्यांनंतर त्यांची वास्टॉक कार्यक्रमासाठी निवड झाली. यासाठी युरीने वय, वजन, उंची असे अनेक निकष पूर्ण केले. त्याच्यासह एकूण २९ वैमानिकांची निवड करण्यात आली, तर एकूण १५४ वैमानिक शर्यतीत सहभागी झाले होते. त्यानंतर टॉप २० वैमानिकांची निवड करण्यात आली, ज्यामध्ये यूपी गागारिनचाही समावेश होता. या सर्व वैमानिकांना ऑलिम्पिक खेळाडूसारखे कठोर प्रशिक्षण देण्यात आले. सर्व प्रशिक्षण आणि इतर औपचारिकता पूर्ण केल्यानंतर, १२ एप्रिल १९६१ रोजी, यूपी गॅगारिनने अंतराळात उड्डाण केले आणि असे करणारा तो जगातील पहिला माणूस बनला. कझाकस्तानमधील बायकोनूर कॉस्मोड्रोम येथून त्यांनी व्होस्टोक-१ या अंतराळयानाद्वारे यशस्वी उड्डाण केले. पहिल्या पाच टप्प्यातील इंजिनांनी त्याचे वाहन दुसऱ्या टप्प्यावर नेले. नंतर कोर इंजिनने युरीचे वाहन उपनगरीय प्रक्षेपण मार्गावर लाँच केले. यानंतर, पुढील उच्च टप्प्यात, वाहन त्याच्या कक्षेत पोहोचले आणि १०८ मिनिटे अंतराळात चक्कर मारून परत आले. अशाप्रकारे युरी गागारिन हा अवकाशातून पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालणारा पहिला व्यक्ती ठरला.

# हापूस आंब्यावर युद्धाचे सावट

## ● बागायतदार धास्तावले ●यंदा उत्पादनात ४० टक्के घट होण्याची शक्यता

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

आखाती देशांमधील युद्धस्थितीमुळे आंबा बागायतदार चांगलेच धास्तावले आहेत. या युद्धाचा परिणाम आंबा निर्यातिवर थेट होण्याची शक्यता वर्तविली जावू लागली आहे. यामुळे आंबा बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. आखाती देशात मोठ्या प्रमाणावर भारतीय लोक वास्तव्यास आहेत. त्यामुळे भारतातून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर आंबा निर्यात केला जातो. मात्र, सद्यस्थितीत युध्द न थांबल्यास आंबा निर्यात पूर्णतः ठप्प होणार आहे.

कोकणातील हापूस आंब्याच्या निर्यातीवर परिणाम होईल का, याबाबत चिंता व्यक्त होत असताना अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण यांनी स्पष्ट केले आहे की, हापूस निर्यातीवर कोणताही मोठा परिणाम होणार नाही. मात्र, युद्धामुळे हवाई आणि समुद्री वाहतुकीत अडथळे निर्माण झाल्यास निर्यातीत तात्पुरती अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



यंदा कोकणात हापूस उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मागील वर्षाप्रमाणेच निसर्गाच्या लहरीपणाचा फटका यंदाही आंबा बागायतदारांना बसला आहे. कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या जिल्ह्यांत हापूस आंब्याची मोठ्या प्रमाणावर लागवड होते. अंदाजे १ लाख ते १.८२ लाख हेक्टर क्षेत्रात आंबा लागवड असून, त्यातून दरवर्षी सुमारे ३,०८,४८० मेट्रिक टन उत्पादन घेतले जाते.

मुंबईतील वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीमधून हापूस आंब्याची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. एकूण निर्यातीपैकी ४० टक्के निर्यात वाशी मार्केटमधून होते. त्यापैकी ३० टक्के माल आखाती देशांमध्ये जातो. हापूस प्रामुख्याने दुबई, बहरीन, कतार, दोहा, कुवेत, सौदी अरेबिया आणि जॉर्डन या देशांमध्ये निर्यात केला जातो. उर्वरित १० टक्के माल इतर देशांमध्ये पाठवला जातो. युद्धामुळे वाहतूक विस्कळीत झाल्यास निर्यात होणारा मध्यम आकाराचा आंबा स्थानिक बाजारपेठेतच अडकण्याची शक्यता आहे. सध्या कोकणातून वाशी मार्केटमध्ये येणाऱ्या पेट्यांची संख्या कमी आहे. दररोज ६० ते ७० पेट्या बाजारात दाखल होत आहेत. त्यापैकी १० टक्के माल रत्नागिरी जिल्ह्यातील आहे. सध्या ५ ते ७ डझनच्या हापूस पेटीला ६ ते १२ हजार रुपये असा चांगला दर मिळत आहे. यावर्षी हापूस आंब्यावर तुडतुड्याचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर आढळून आला आहे. ऑक्टोबर महिन्यात अपेक्षित उष्णता न मिळाल्याने मोहर नीट फुलला नाही, त्यामुळे उत्पादन घटण्याची शक्यता वाढली आहे. याचा फटका आंबा आणि काजू बागायतींनाही बसला आहे.

> **२५ मार्चनंतर हापूसची मोठी आवक एकाचवेळी बाजारात येण्याची शक्यता आहे. नेमक्या याच काळात युद्ध सुरू राहिले तर निर्यातीला फटका बसू शकतो. युद्धाच्या कालावधीवरच हापूस निर्यातीचे भवितव्य अवलंबून आहे.**
> **जयेश पाटील, विक्रेता**

> **यावर्षी आंबा उत्पादन कमी असणार आहे. त्यामुळे बागायतदारांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. उत्पादन कमी असल्याने स्थानिक बाजारातही पेट्या कमी असतील. युद्धस्थिती कमी झाल्यास आखाती देशांसह इतर देशांमध्ये निर्यात वाढून चांगला दर मिळेल, अशी अपेक्षा आहे.**
> **राजाराम पाटील ,**
> **आंबा बागायतदार, रायगड**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ मार्च
१) श्री. गजानन गोविंद मानकर नागाव, अलिबाग, ९-३-१९४४
२) श्री. मनजी लालजी गाला अलिबाग, ९-३-१९४२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते
**स्व. प्रभावती महादेव पाटील, स्मरणार्थ अलिबाग**

## कडक उन्हामुळे कलिंगडाला मागणी

**रेवदंडा :** रेवदंड्यात उन्हाच्या प्रखर झळांनी अंगाला चटके बसत असताना शरीराला थंडावा मिळावा यासाठी नागरिकांची पावले कलिंगडाच्या खरेदीकडे वळली आहेत. रेवदंडा शहरात तसेच आजूबाजूच्या गावांत कलिंगड विक्रीसाठी दाखल झाले असून, नागरिक, पर्यटकांकडून कलिंगडाला प्रचंड मागणी असल्याचे दिसून येत आहे. कडक उन्हात चटकन थंडावा देणाऱ्या या ग्रीष्मकालीन वरदानाला खरेदीसाठी गर्दी झाली असून, ४० रुपयांपासून २०० रुपयांपर्यंत नगावारी विक्री होत आहे.

## जागतिक महिला दिन संपन्न

**श्रीवर्धन:** गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त शारीरिक व मानसिक आरोग्य हीच खरी संपत्ती या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अपर्णा बंदरकर, श्रीवर्धन, या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करत निरोगी जीवनशैली, सकारात्मक विचारसरणी आणि तणावमुक्त जीवन याबाबत विद्यार्थिनींना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य, प्रा. किशोर लहारे होते. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील महिला विकास मंचाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दिपाली पाठरावे यांनी केले.

## मुरुड येथे लाईनमन दिवस साजरा

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुड उपविभाग महावितरण कार्यालयामध्ये लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. मुरुड उपविभागाअंतर्गत कार्यरत सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गुणगौरव म्हणून केंद्र शासनाच्या आदेशानुसार ४ मार्च हा दिवस लाईनमन दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

मुरुड उपविभागातील सर्व शाखा-मुरुड शहर शाखा, मुरुड ग्रामीण शाखा, बोल मांडला शाखा, कोकबन शाखा, आगरदांडा शाखा माझगाव व नांदगाव या शाखा कार्यालयामधील सर्व कर्मचाऱ्याना आमंत्रित करण्यात येऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमास उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी, सहाय्यक अभियंता दिनेश ढाले, परमानंद बैकर, कनिष्ठ अभियंता, मनोज देशमुख, संदेश होंडे, सतीश खरात, सचिन पवार, कासिम शैख मुख्य तंत्रज्ञ राजेंद्र पवार, समीर शिंदे, प्रणित वाडकर, गौरी राठोड, विनायक ताजवे, सुप्रिया साष्टे व सर्व जनमित्र मोठ्या संखेने उपस्थित होते.

यावेळी उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांनी मुरुड शहर व ग्रामीण भागातील वीज पुरवठा सुरळीत व व्यवस्थित ठेवण्याचे महत्वपूर्ण काम लाईनमन करत असल्याचे सांगितले.

## फणसवाडीत औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्याच्या हेतूने श्री युवा मित्र मंडळ कामोठेचा विघ्नहर्ता व पनवेल तहसील कार्यालय, महसूल व वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा परिषद शाळा, फणसवाडी येथे विविध औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये औषधी वनस्पतींबद्दल जागरूकता निर्माण करण्यात आली. तसेच महसूल विभागाच्या वतीने नागरिकांच्या विविध प्रशासकीय अडचणी व समस्यांचे निराकरण करण्यासाठी समाधान शिबिर आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास मंडळाचे अध्यक्ष सुनील चौधरी, सचिन तांबोळी, राहुल बुधे, अशोक भानुसे, ऋषी पुंडे, सागर पाटील उपस्थित होते.

## हिंद टर्मिनल्स सीएफएस कंपनी विरोधात शेतकरी आक्रमक

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनीवर हिंद टर्मिनल्स सीएफएस कंपनी उभारली असून, या कंपनीसाठी येथील ४० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत.

या कंपनीने बाधित प्रकल्पग्रस्त ४० शेतकऱ्यांच्या वारसांसह स्थानिक भूमिपुत्रांना कंपनीमध्ये सामावून घेण्याचे आश्वासन दिले असताना देखील, कंपनी सुरू होऊन एक महिन्यापेक्षा जास्त दिवस उलटून जाऊन, देखील कंपनी येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त बाधित शेतकऱ्यांच्या वारसांना तसेच येथील स्थानिक भूमिपुत्रांना कंपनीने कामावर ठेवून न घेता मुजोर कंपनीने ३० जानेवारी रोजी सुमारे दोनशे कामगार बाहेरून आणून कंपनी चालू केली आहे. विशेषता: स्थानिक एकही कामगार आम्ही कंपनीत कामावर घेणार नाही ही ठाम भूमिका कंपनीने घेतली आहे.

स्थानिकांना कंपनी विरोधात जे काय करायचे असेल ते करू शकता. अशी कंपनी प्रशासनाने बाधित शेतकरी स्थानिकांना धमकी देखील दिली आहे. कंपनी प्रशासनाने शेतकऱ्यांची दिशाभूल व मनमानी करून, शेतकऱ्यांवर व भूमिपुत्रांवर मोठा अन्याय केला असून शेतकऱ्यांना उध्वस्त करण्याचा डाव कंपनीने अवलंबिला आहे. त्यामुळे येथील भूमिपुत्रांनी संताप व्यक्त केला असून, भूमिपुत्र शेतकरी कंपनी प्रशासना विरोधात न्याय हक्क मागण्यासाठी आक्रमक झाला आहे. त्यासाठी मंगळवारी १० मार्च रोजी भूमिपुत्र शेतकरी एकत्र येत, मुजोर कंपनीच्या विरोधात प्रवेशद्वारासमोर भूमिपुत्रांना योग्य तो न्याय मिळेपर्यंत बेमुदत आंदोलन करण्यासाठी सज्ज झाले आहेत. या आंदोलनाचे लेखी निवेदन पोलीस आयुक्त नवी मुंबई, पोलीस उपायुक्त परिमंडळ- २ बेलापूर, सहाय्यक पोलीस आयुक्त न्हावाशेवा बंदर उरण, जिल्हाधिकारी रायगड अलिबाग, उरण तहसीलदार, उपअभियंता सा. बा. विभाग उरण या संबंधित खात्यांना चिरनेर गावातील शिष्टमंडळाचे तथा प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष हिराजी बारकू ठाकूर, सरपंच भास्कर मसणाची मोकल, शिवसेनेचे उरण तालुका प्रमुख संतोष हिराजी ठाकूर, भाजपचे पूर्व विभाग सह खजिनदार सुशांत सुधीर पाटील, शेकापचे पूर्व विभाग सहचिटणीस सुरेश गजानन पाटील, चिरनेर गाव तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार अंकुश परदेशी व ग्रामस्थांसह शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आले आहे.

## डोक्यावरून पालखी नाचवण्याची परंपरा

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

कोयना जांब्रुक चौक वावंढळ गावच्या देवीची पालखी डोक्यावरून नाचविण्याची परंपरा तरुण पिढीने आजही राखली जात आहे. कोयना जांब्रुक चौक वावंढळ या गावचा शिमगा झाला की पालखी घरोघरी भेटीला जाते, सायंकाळी गावच्या मैदानावर तरुण पिढी पालखी जोशात नाचवली जाते, मात्र एकट्याने डोक्यावरून पालखी नाचविणे म्हणजे चमत्कारच म्हणावा लागेल. या गावचे भारतीय आयकर विभागात कार्यरत असलेले संजय कदम हे गेली चाळीस वर्षे पालखी डोक्यावर घेऊन एकटेच नाचत असतात.

## नांदगाव विद्यालयात शिक्षिका-विद्यार्थिनींचा सन्मान




**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

जागतिक महिला दिनानिमित्त महिला शिक्षिका तसेच विद्यार्थिनींच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.यावेळी महिला शिक्षिका जयश्री अहिरराव यांनी महिला दिनाबद्दल माहिती सांगत असताना त्याचा इतिहास आणि विद्यार्थ्यांना उद्बोधनपन मार्गदर्शन केले. शिक्षिका विद्या भिसे यांनी महिला दिनाचे महत्त्व आणि भारतीय महिलांचे योगदान याबद्दल सविस्तर माहिती सांगितली.

प्रा भूषण सुतार यांनी जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रियांनी विविध क्षेत्रात केलेल्या कार्याचे योगदान तसेच महिला सक्षमीकरण होण्यासाठी विविध योजना शासना मार्फत राबविले जाते यांची माहिती सांगितली.

यावेळी प्राचार्य बबन पालवे, अशोक शिंदे, नागेश सायगावकर, भूषण सुतार, स्वाती शिंदे, तन्मयी शिंदे, जयश्री अहिरराव, विद्या भिसे, सोनल ठकोरे, शामल कंबलकर, अंकिता खैरे आदी शिक्षक वृंद उपस्थित होते.

## जिते येथील आरटीओ कार्यालय परिसरात श्री सदस्यांची स्वच्छता

**। खरोशी । वार्ताहर ।**

थोर समाजसुधारक डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीचे औचित्य साधून पेण व पनवेल तालुक्यातील श्री सदस्यांनी आरटीओ कार्यालय जिते येथे कार्यालय परिसरात स्वछता मोहीम राबवली.

यामध्ये ४ ते ५ टन सुकलेले गवत व इतर कचरा गोळा करण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत पेण व पनवेल तालुक्यातील ११२५ श्री सदस्य सामील झाले होते.

जिते गावानजीक असलेल्या आर टी ओ कार्यालयाच्या सुमारे दहा एकर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. पेण येथील या उपप्रादेशिक कार्यालयाच्या आवारात २०१८ साली डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने १४०० विविध जातींच्या वृक्षाची लागवड करण्यात आली होती.



## निवडक

### गावठी बॉम्ब ठेवणाऱ्याला अटक

**आचरा :** स्फोटक पदार्थांच्या साहाय्याने मानवी जीवितास धोका पोहोचवण्याच्या आणि मालमत्तेची हानी करण्याच्या उद्देशाने जिवंत गावठी बॉम्ब बाळगल्याप्रकरणी आचरा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. याप्रकरणी संशयित प्रकाश दत्ताराम परब (वय ६७, रा. हिवाळे खालची परबवाडी, ता. मालवण) यांना शुक्रवारी (दि.६) पहाटे ताब्यात घेण्यात आले. न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.ही घटना गुरुवारी (दि.५ मार्च) सायंकाळी सातच्या सुमारास कसाल नदीच्या किनारी, हिवाळे-परबवाडी येथे घडली. येथे गावठी बॉम्ब आढळून आले. या प्रकरणाची माहिती हिवाळे गावचे पोलीस पाटील वीरेंद्र दिनेश कदम (वय ५४, रा. हिवाळे बौद्धवाडी) यांनी आचरा पोलीस ठाण्यात दिली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी आढाव यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांच्यासोबत आचरा पोलीस निरीक्षक प्रदीप पोवार, मालवण पोलीस निरीक्षक जगताप, साहाय्यक पोलीस निरीक्षक माने, उपनिरीक्षक टेंबूलकर, गाडेकर, साटम आदी अधिकारी उपस्थित होते. घटनास्थळावरून पोलिसांनी तीन जिवंत गावठी बॉम्ब जप्त केले आहेत. अधिक सुरक्षिततेसाठी बॉम्बशोध व नाशक पथकास पाचारण केल्याची माहिती पोलीस निरीक्षक प्रदीप पोवार यांनी दिली. या प्रकरणाचा अधिक तपास उपनिरीक्षक टेंबूलकर करत आहेत.

### विद्यार्थिनींचा लेझिम वादनाचा विक्रम

**डोंबिवली :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून डोंबिवली, कल्याण शहर परिसरातील सत्तरहून अधिक शाळांमधील नऊ हजार १११ विद्यार्थिनींनी रविवारी सकाळी डोंबिवली एमआयडीसीतील सावळाराम महाराज क्रीडा संकुलातील मैदानावर सामुहिक लेझिम वादन करून विश्व विक्रमाची नोंद केली. डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण विभागाने या कार्यक्रमाचे संयुक्तपणे आयोजन केले होते. भाजप प्रदेशाध्यक्ष आणि स्थानिक आमदार रवींद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शालेय गणवेशात विद्यार्थिनी या लेझीम वादनात सहभागी झाल्या होत्या. त्यांना लेझिम वादनातील सहभागाबद्दल एक लाल गमछा देण्यात आला होता. त्यामुळे सावळाराम महाराज क्रीडासंकुलात विविध प्रकारच्या गणवेशांमुळे रंगीबेरंगी वातावरण होते. ढोल ताशांचा गजर आणि एक ताल, एक सूर आणि एक नादामध्ये विद्यार्थिंनीनी लेझिम वादन करून उपस्थितांना आश्चर्यचकित केले. मागील काही महिन्यांपासून या उपक्रमाची जोरदार तयारी सुरू होती. कल्याण, डोंबिवली शहर आणि ग्रामीण भागांमधील विद्यार्थिनी या उपक्रमात सहभागी होण्यासाठी दररोज आपल्या शाळेत सराव करत होत्या. रविवारी सकाळी सावळाराम क्रीडा संकुलात लेझिम वादन कार्यक्रमाला सुरूवात झाली.

### महिलेची नऊ लाखांची फसवणूक

**डोंबिवली :** मुंबईतील अंधेरी येथील महिलेने चार वर्षापूर्वी टिटवाळा येथे एका नवनिर्माणाधिन इमारतीत ३६ लाख रूपये किमतीची एक सदनिका खरेदी केली होती. या सदनिका खरेदीतील नऊ लाख रूपये महिलेने आपल्या बँक खात्यामधून विकासकाला हस्तांतरित केले होते. चार वर्ष होत आली तरी सदनिका नोंदणीकृत करून मिळत नाही आणि भरणा केलेले पैसे विकासकाकडून परत मिळत नसल्याने घर खरेदीदार महिलेने विकासक आणि याप्रकरणातील एका मध्यस्था विरूध्द टिटवाळा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. महिला अंधेरी मरोळ भागात आपल्या कुटुंबियांसह राहतात. नवीन घर खरेदी करण्याच्या शेख कुटुंब विचारात होते. वसीम शेख यांचे मित्र प्रशांत शिरसाठ यांनी अंबरनाथ येथील विकासक विवेक श्रीवास्तव यांची टिटवाळा येथे कॅन्टस्टो इन्फिनिटी नावाची बांधकाम कंपनी आहे. या कंपनीचे आंबिवली गाळेगावमध्ये लॅपोमोडे गृहप्रकल्प नावाने एका नवीन इमारतीचे काम सुरू आहे असे सांगितले. विकासकाने इमारतीचा आराखडा शेख यांना दाखविला. हे काम डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण होईल, असे विकासकाने शेख यांना सांगितले. शेख कुटुंबाने टु बिचके सदनिका खरेदी करण्याचा निर्णय घेतला. ही सदनिका ३६ लाख रूपयांची होती. सदनिका नोंदणीकृत करण्यासाठी शेख कुटुंबाने नऊ लाख रूपये विकासकाच्या खात्यावर धनादेशाने भरणा केले. या रकमेच्या पाच लाखाच्या पावत्या विकासकाने शेख यांना दिल्या. उर्वरित चार लाखाच्या पावत्या पंकज यांच्या ताब्यात आहेत.

### अस्मी लाड जाणार राष्ट्रीय परिषदेला

**सिंधुदुर्ग :** वायंगणी ग्रामपंचायतीच्या सरपंच अस्मी प्रशांत लाड यांची केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयामार्फत नवी दिल्ली येथे होणाऱ्या महिला लोकप्रतिनिधींच्या राष्ट्रीय परिषदेसाठी निवड झाल्याची आनंददायी आणि अभिमानास्पद बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने राज्यातील विविध जिल्ह्यातील महिला लोकप्रतिनिधींमधून निवड करून ही यादी केंद्र शासनाकडे पाठविली आहे. त्यामध्ये कोकण विभागातून सिंधुदुर्ग जिल्हा आणि कणकवली तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी अस्मि प्रशांत लाड यांना मिळाली आहे. त्यांच्या या निवडीमुळे वायंगणी गाव, कणकवली तालुका तसेच संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. देशभरातील महिला लोकप्रतिनिधींना एकत्र आणून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे नेतृत्व अधिक सक्षम करणे, ग्रामीण विकासाला गती देणे तसेच महिला सक्षमीकरणाच्या विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी ही राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत सहभागी होण्याची संधी मिळणे ही अत्यंत गौरवाची बाब आहे.

### भारताच्या सामन्यावर ठाण्यात सट्टा

**ठाणे :** टी-२० वर्ल्डकप क्रिकेट सामन्यामध्ये ऑनलाईनरित्या सट्टा खेळणाऱ्या एकाला ठाणे पोलिसांनी ताब्यात घेतले. विनीत मोरे (२६) असे आरोपीचे नाव असून तो भारत-इंग्लड सामन्यामध्ये तो सट्टा खेळत होता. त्याच्याविरोधात कोपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. चाळीतील एका घरामध्ये ही सट्टेबाजी सुरु असल्याचे तपासात समोर आले आहे. सट्टेबाजीत लाखो रुपयांची अवघ्या काही तासांत उलाढाल होते. क्रिकेट सामन्यांत जीतका मोठा संघ तितकी सट्टेबाजी अधिक असते. असाच काहीसा प्रकार ठाण्यातील अतिशय गजबजलेल्या ठिकाणी घडला. टी-२० वर्ल्डकप क्रिकेट सामने सुरु असून काही दिवसांपूर्वीच भारत आणि इंग्लड सेमी फायनल सामना झाला. या सामन्यासाठी एकजण कोपरी येथे सट्टा खेळत असल्याची माहिती ठाणे पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाला प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे, खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी आणि कर्मचारी कोपरी येथील कोपरी जवळील चिखलवाडी परिसरात गेले.त्यांनी चिखलवाडीमधील चाळीतील एका दुमजली घरामध्ये छापा टाकला. त्यावेळी विनीत मोरे हा ऑनलाईन पद्धतीने सट्टा खेळत असल्याचे दिसले. त्याने घरातील सोफ्यावर सात मोबाईल फोन सुरु केले होते. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, त्याने सट्टा खेळत असल्याचे कबूल केले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून तो एका संकेतस्थळाचा वापर करुन सट्टा खेळत असल्याचे उघड झाले.

गावांमध्ये होणार जनसुनावणी | भूसंपादनानंतरच कामाचा श्रीगणेशा

# सोनवडे घाटमार्गाला 'पर्यावरण'ची मंजुरी

**। कणकवली । वृत्तसंस्था ।**

घोटगे-सोनवडे घाटमार्गाच्या नव्या अलायमेंटला आयआयटी मुंबईच्या स्थापत्य अभियांत्रिकी तज्ज्ञांनी डिसेंबर-२०२५ मध्ये मंजुरी दिली. त्यानंतर केंद्रीय पर्यावरण समितीनेही प्रस्तावित घाटमार्गाला मंजुरी दिली आहे; मात्र घाटमार्गाची रचना बदलल्याने घाटमार्ग जात असलेल्या गावांमध्ये जनसुनावणी होणार आहे.

याशिवाय घाटमार्गामध्ये नव्याने बाधित होणाऱ्या खासगी जागेचे संपादनही करावे लागणार आहे. ही भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर घाटमार्गाचा अंतिम डीपीआर तयार होईल. त्या 'डीपीआर'ला पुन्हा आयआयटी, मुंबईच्या स्थापत्य विभागाकडून ना-हरकत मिळणे आवश्यक आहे. ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या घाटमार्गाची निविदा निघून प्रत्यक्ष रस्ताकाम सुरू होणार आहे. त्यासाठी अद्यापही दीड ते दोन वर्षे कालावधी लागण्याची शक्यता आहे.

मोनार्च कंपनीने २०२३ मध्ये आखणी केलेल्या नव्या मार्गाचा अहवाल राज्याला सादर केला. यात घाटमार्गाची लांबी १० किलोमीटरवरून १३.३४ किलोमीटर झाली. त्यामुळे वाढीव ६ किलोमीटर अंतरासाठी नव्याने भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली.

अभियांत्रिकी तज्ज्ञ समितीनेही १० डिसेंबर २०२५ ला नव्या घाटमार्गाच्या रचनेमध्ये काही सुधारणा करण्याचे निर्देश देऊन घाटमार्गाच्या नव्या अलायमेंटला मंजुरी दिली आहे. त्याबाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली.

घोटगे-सोनवडे घाटमार्गमधील गावांमध्ये ऑक्टोबर २०१६ ते जानेवारी २०१७ मध्ये जनसुनावणी झाली होती; मात्र आता घाटमार्गात ६ किलोमीटरचे क्षेत्र वाढले आहे. त्यामुळे शिवडाव खुर्द, शिवडाव बुद्रुक, विंजोळे आणि सिंधुदुर्गातील घोटगे, सोनवडे तर्फ कळसुली, घाडीगाव आणि दुर्गानगर या गावांमध्ये जनसुनावणी होणार आहे. या सुनावणीचा अहवाल आणि अंतिम पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवाल तयार करून तो केंद्रीय पर्यावरण समितीकडे सादर केला जाणार आहे. या अहवालाच्या सादरीकरणानंतर केंद्रीय पर्यावरण समिती घाटमार्गाला अंतिम मंजुरी देणार आहे. या मंजुरीनंतरच घाटमार्गासाठी राज्याकडून निधीची तरतूद होऊन निविदा प्रक्रिया सुरू होईल. तसेच प्रत्यक्ष घाटमार्गाचे काम सुरू होणार आहे. त्यासाठी आणखी दीड ते दोन वर्षे कालावधी लागण्याची शक्यता आहे.

घोटगे-सोनवडे घाटमार्गाच्या नव्या अलायमेंटनंतर सर्व प्रकारच्या परवानगींची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच या घाटमार्गासाठी सुमारे ६०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याचा अंदाज सार्वजनिक बांधकाम अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला. दरम्यान, हा घाटमार्ग सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार असून, या घाटमार्गालगतची गावे विकासाच्या टप्प्यावर येणार आहेत.


# ताम्हिणीतील दरडींचा धोका संपणार

## एनएचएआयकडून पर्यायी महामार्गाचा सरेखन आराखडा तयार; पुणे–दिघी बंदर अंतर ५० किमीने कमी होणार

| रायगड | प्रतिनिधी |

सातत्याने वाहतूक कोंडी, दरड कोसळणे, अपघात आणि धोकादायक असणाऱ्या ताम्हिणी घाटातील प्रवास सुलभ आणि सुखरूप होण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून पावले उचलण्यात आली आहेत. महामार्ग प्राधिकरणाकडून पर्यायी मार्गासाठी सरेखन आराखडा तयार करण्यात येत आहे. या पर्यायी मार्गामुळे पुणे ते कोकण प्रवास जलद होणार आहे.

केंद्र सरकारने पुणे–चांदणी चौक–पौड–ताम्हिणी–माणगाव–दिघी बंदर या मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा दिला आहे. मुंबई, पुणे रस्तेमार्गाद्वारे जाताना या मार्गाचा अधिक वापर केला



जातो. मात्र, महामार्गादरम्यान ताम्हिणी घाटातील अरुंद रस्ते, तीव्र वळणे आणि पावसाळ्यातील दरड कोसळणे यामुळे प्रवास धोकादायक झाला आहे.

मंद वाहतुकीमुळे कंटाळवाणा प्रवास होत असून, अनेकदा पावसाळ्यात वारंवार हा मार्ग बंद करण्यात येतो. या मार्गावरून दैनंदिन प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना याचा फटका बसत असून, अवजड वाहनांची वाहतूकही ठप्प होत असल्याने आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः दिघी बंदर आणि रायगड जिल्ह्यातील माणगाव परिसरातील औद्योगिक क्षेत्राशी जोडल्या गेलेल्या दळणवळण व्यवस्थेवर परिणाम होत आहे.

या समस्येवर उपाय शोधण्यासाठी अनेक पर्यायांचा विचार केला जात आहे. यामध्ये एक पर्याय म्हणजे पानशेत – माणगाव–दिघी असा पूर्णपणे नवीन मार्ग विकसित करणे, ज्यामुळे सध्याच्या ताम्हिणी भागाला वगळून पर्यायी मार्गाचा

> "ताम्हिणी घाटातील अवघड मार्गाऐवजी सुलभ आणि सुरक्षित प्रवासासाठी पर्यायी सरेखन आराखडा केला जात आहे. यामुळे पुणे–कोकण रस्ते मार्गावरील दळणवळण यंत्रणा मजबूत होईल. तसेच, दिघी बंदराच्या विस्तारासह औद्योगिक विकासाला चालना मिळेल. स्थानिक प्रवाशांसह वाहतूकदारांसाठी हा मोठा दिलासा ठरणार आहे."
> संजय कदम, प्रकल्प संचालक, एनएचएआय

अवलंब करता येईल किंवा दुसरा पर्याय म्हणजे घाट रस्त्याचे रुंदीकरण, धोकादायक वळणे कमी करणे आणि डोंगरवाडी ते ताम्हिणी दरम्यान बोगदा बांधणे.

या बोगद्यामुळे सुमारे ३० किलोमीटरपर्यंत कमी होऊ शकेल आणि प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित व जलद करण्यासाठी प्रयत्न आहेत, असे महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. त्यानुसार प्राधिकरणाकडून या मार्गावरील पर्यायी मार्गाबाबत सरेखन आराखडा तयार करण्यात येत असून, तज्ज्ञांच्या मते माणगाव–कुंभे–घोळ–पानशेत–पुणे असाही मार्ग प्रभावी ठरू शकतो, असा पर्याय देण्यात आला आहे.

## निवडक



### नेरळमध्ये आरोग्य तपासणी शिबीर

**नेरळ :** नेरळ येथील बापूराव धारप सभागृह येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून व्यापारी वेल्फेअर असोसिएशन आणि श्री समर्थ सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानेनेरळमधील व्यापारी वर्गातील सदस्य व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आरोग्य तपासणी आणि सीपीआर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.नेरळ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटरच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमाला व्यापारी वर्गातून मोठा प्रतिसाद मिळाला. व्यापारी बांधवांचे धावपळीचे जीवन आणि कामाचा ताण लक्षात घेता, त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली रक्तातील साखर तपासणी, रक्तदाब तपासणी, ईसीजी आणि एक्स–रे तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य सल्ला अशा आरोग्य सुविधा मोफत पुरवण्यात आल्या.तसेच आरोग्य तपासणी सोबतच, आपत्कालीन परिस्थितीत जीव वाचवण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या सीपीआर आणि प्रथमोपचार विषयावर विशेष प्रशिक्षण देण्यात आले. अचानक हृदयविकाराचा झटका आल्यास किंवा अपघात झाल्यास त्वरित काय उपाययोजना कराव्यात, याचे प्रात्यक्षिक डॉक्टरांनी यावेळी सादर केले. या उपक्रमासाठी डॉ. विवेक भगत आणि डॉ. हेमंत इंगोले यांच्यासह त्यांच्या वैद्यकीय पथकाने रुग्णांची तपासणी केली. व्यापारी वेल्फेअर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी या शिबिराचे नियोजन यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. नेरळमधील मोठ्या संख्येने व्यापाऱ्यांनी आपल्या कुटुंबासह उपस्थित राहून या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.



### महिला मुख्याध्यापिकांचा सत्कार

**पनवेल :** पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पनवेल तालुक्यामध्ये विद्यादान तसेच संस्था चालनाचे पवित्र कार्य करत असणाऱ्या महिला मुख्याध्यापिकांचा सन्मान केला. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील व अध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेलच्या शासकीय विश्रामगृहात हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यामध्ये डी. एस. पी. शिक्षण संस्थेच्या सीनियर कॉलेजच्या प्राचार्या अस्मिता म्हात्रे, रायगड जिल्हा परिषदेच्या बामण डोंगरी शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहा पाटील, गोखले एज्युकेशन सोसायटी खारघरच्या प्रचार्या डॉक्टर श्रुती काळे जाधव, अल्मा मॅटर पब्लिक स्कूल च्या मुख्याध्यापिका प्रणाली पाटील, चिंचपाडा येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका रुपाली मोरे, खारघरच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका आकांक्षा उपरेती, शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये कला शास्त्र वाणिज्य महाविद्यालय कळंबोली येथे कार्यरत असणाऱ्या आदर्श कार्यालयीन प्रमुख म्हणून दिपीका दीपक घोसाळकर तर आदर्श शिक्षिका निवेदिका म्हणून भारती धोंडे यांना सन्मानित करण्यात आले. मंचाचे सल्लागार मंदार दोंदे यांनी प्रास्ताविकातून संस्थेने जागतिक महिला दिनानिमित्त आजपर्यंत केलेल्या सत्कार सन्मानांचे विस्तृत विवेचन केले. त्यानंतर उपाध्यक्ष दीपक घोसाळकर यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत मनोगत व्यक्त केले. अस्मिता म्हात्रे यांनी या सन्मान सोहळ्याच्या आयोजनाबद्दल पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे आभार मानले. भारती धोंडे आणि आकांक्षा उपरेती यांनी आपापली मनोगते व्यक्त केली. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये सल्लागार माधव पाटील म्हणाले की आज अनेक जबाबदाऱ्या लीलया पेलणाऱ्या तुमच्यासारख्या भगिनींचा सन्मान करताना आम्हाला अत्यानंद होत आहे. या सन्मान सोहळ्याला सल्लागार माधव पाटील, अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार संजय कदम, सल्लागार मंदार दोंदे, उपाध्यक्ष दीपक घोसाळकर, उपसचिव राजीव गाडे, सदस्य प्रवीण मोहोकर, लालचंद यादव, सुनील राठोड यांची सन्माननीय उपस्थिती होती.

### फ्लोअर मिलतर्फे दळणात ५० टक्के सूट

**पनवेल :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पनवेल येथील जयहिंद मसाला अँड फ्लोअर मिलतर्फे महिलांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत पनवेल शहरातील रायगड बाजार येथील त्यांच्या मसाला अँड फ्लोअर मिलमध्ये दळण सेवांवर ५० टक्के सूट देण्यात आली असून महिलांनी या ऑफरचा मोठ्या उत्साहाने लाभ घेतला. महिलांच्या सन्मानार्थ आणि त्यांच्या कष्टांची दखल घेत हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या सवलतीमुळे परिसरातील अनेक महिलांनी दळण करून घेत उपक्रमाचे स्वागत केले. महिला दिनाच्या निमित्ताने समाजात महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्याचा आणि त्यांना प्रोत्साहन देण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे जयहिंद मसाला अँड फ्लोअर मिलच्या व्यवस्थापनाने सांगितले. या उपक्रमामुळे परिसरात महिला दिनाचा उत्साह अधिकच वाढला असून नागरिकांनीही या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल), इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- **ब्लॉक विकणे आहे.** चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील ६६० स्क्वे फूट संपर्क : ९०२८५६५९१७, ९८२२०३१०१७
- **कर्जतमधील एका नामांकित** सोसायटीतील २ bhk बंगला विकणे आहे. एजंट क्षमस्व संपर्क– ९६०४१२३५५४/+९८२२४९९३२१
- **वॉन्टेड अलिबागेतील वृद्ध अपंग जोडप्यास** रात्री साडेदहा ते पहाटे साडेचारपर्यंत पेशंटला मदतनीस म्हणून सावध झोप असणारी महिला वृद्ध मदतनीस पगार रोजच्या रोज आठशे रूपये. ८५३०३०९७६५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२९९०/ २२२७६१

## आदिवासी महिलांचा स्त्री शक्ती सन्मान पुरस्काराने गौरव

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी आपटा हद्दीतील कोरलवाडी येथील आदिवासी वाडीत स्वातंत्र्याच्या ७९ वर्षांनंतर चोवीस तास ट्रिपल फिल्टर पाणी उपलब्ध करून घेणाऱ्या कोरळवाडीतील आदिवासी रणरागिणींचा जागतिक म हिला दिनानिमित्त गौरव करण्यात आला.

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वतीने रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ येथे आयोजित कार्यक्रमात चित्रपट व नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, नगरसेविका दर्शना भोईर, साहित्यिक अरुण म्हात्रे, संजय गुंजाळ, गणेश कोळी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



आपटा हद्दीतील कोरळवाडी या सुमारे चाळीस कुटुंबांच्या आदिवासी वाडीत स्वातंत्र्याच्या ७९ वर्षांनंतरही पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय नव्हती. वाडीतील नागरिकांना दररोज दीड ते दोन किलोमीटर पायपीट करून दूषित पाणी आणावे लागत होते. त्यामुळे आरोग्याच्या समस्या वारंवार निर्माण होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी व्यक्त केली होती. ही वाडी शासनाच्या टंचाईग्रस्त आराखड्यात समाविष्ट असतानाही पाण्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्याने वाडीतील महिलांनी संतप्त होऊन संघटित लढा उभारला. आदिवासींच्या न्यायहक्कासाठी कार्यरत असलेल्या ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली २६ फेब्रुवारीपासून रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या दालनासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले. एकतर आमच्या वाडीला कायमस्वरूपी पाणी द्या, अन्यथा आमचा जीव इथेच जाईल, असा ठाम इशारा उपोषणकर्त्या महिलांनी प्रशासनाला दिला.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सरवदे यांनी उपोषणकर्त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र महिलांनी आपला निर्धार कायम ठेवला.

दरम्यान उपोषणकर्त्या बेबी वाघमारे यांची प्रकृती खालावल्याने त्यांना जिल्हा सरकारी रुग्णालयात दाखल करावे लागले. त्यानंतर प्रशासनाने तातडीने हालचाल करून कोरळवाडीत सिडकोच्या जलवाहिनीतून पाइपलाईनद्वारे शुद्ध पाणी पोहोचविण्याची व्यवस्था केली. मागण्यांची लेखी पूर्तता व प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याची खात्री दिल्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले.

स्वातंत्र्याच्या ७९ वर्षांनंतर आपल्या वाडीत २४ तास ट्रिपल फिल्टर पाणी उपलब्ध करून देणाऱ्या या कोरळवाडीतील रणरागिणींचा जागतिक महिला दिनानिमित्त गौरव करण्यात आला.

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वतीने रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ येथे आयोजित कार्यक्रमात पनवेल मधील चित्रपट व नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, नगरसेविका दर्शना भोईर, साहित्यिक अरुण म्हात्रे, संजय गुंजाळ, गणेश कोळी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कोरळवाडीतील महिलांनी संघटितपणे मिळविलेल्या या यशाबद्दल तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## जागतिक महिला दिनानिमित्त गृहपरिचारिकांचा सन्मान

| रसायनी | प्रतिनिधी |

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रसायनी येथील महिला उद्योग मंडळाने समाजातील एका महत्त्वपूर्ण घटकाचा, अर्थात गृहपरिचारिकांचा सन्मान करून एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला आहे. रुग्णसेवा आणि वयोवृद्धांची काळजी घेणाऱ्या या महिलांचा गौरव करण्यासाठी मंडळाने विशेष समारंभाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला उद्योग मंडळाच्या अध्यक्षा सरोजिनी साजवान होत्या. यावेळी त्यांनी आपल्या मनोगतातून गृहपरिचारिकांच्या कार्याचा गौरव केला. समाजातील रुग्ण आणि वयोवृद्ध व्यक्तींची सेवा करण्यात गृहपरिचारिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्या केवळ सेवा करत नाहीत, तर आधार देतात, असे सांगत त्यांनी उपस्थित सर्व गृहपरिचारिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमात उपस्थित गृहपरिचारिकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. त्यांचे गुलाबपूजन करून आणि गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच, त्यांना भेटवस्तू आणि अल्पोपहार देऊन त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली. महिला उद्योग मंडळाच्या या संवेदनशील उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## 'सावित्रीच्या लेकी' भव्य प्रदर्शनाचे आयोजन

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायत हद्दी मधील आगरी समाज हॉल येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सामाजिक कार्यकर्त्या ज्योत्स्ना विरले यांच्या संकल्पनेतून नेरळ–कोल्हारे परिसरात सावित्रीच्या लेकी या भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

धामोते येथील हुतात्मा हिराजी पाटील सभागृहात ७ मार्च रोजी भरवण्यात आलेल्या या प्रदर्शनाला महिलांनी उदंड प्रतिसाद दिला असून, या



माध्यमातून ग्रामीण भागातील महिला नवीन उद्योगासाठी तसेच घरगुती बनवलेल्या वस्तू बाजारात विक्रीसाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. तसेच प्रत्यक्ष कृतीतून महिलांम धील कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने ज्योत्स्ना विरले यांनी हे प्रदर्शन आयोजित केले होते. विशेष म्हणजे, ग्रामीण भागातील महिलांसाठी हे सर्व स्टॉल्स मोफत उपलब्ध करून देण्यात आले होते. यामुळे परिसरातील घरगुती व्यवसाय करणाऱ्या महिलांनी यात मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

## महिला दिनानिमित्त पालक अन् शिक्षकांचा सन्मान

| खरोशी | वार्ताहर |

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा पेण येथे माता पालक शिक्षक व शिपाई मावशी यांचा गुलाबपुष्प व पेढा देऊन सत्कार करण्यात आला.

पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा पेण येथे महिला दिनाचा कार्यक्रम ७ मार्च रोजी बाल न्यायमंडळ रायगड सदस्या तथा पेण एज्युकेशन सोसायटी स्विकृत सदस्या अॅड. निता कदम यांच्या अध्यक्षतेखाली व पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी माजी नगरसेविका प्रतिभा जाधव बालवाडीच्या मुख्याध्यापिका सविता पाटील शाळेच्या मुख्याध्यापिका लेखा ठाकूर आदिंसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे म्हणाल्या की आजचा दिवस हा स्त्रीच्या सन्मानाचा , नारीशक्तीचा दिवस आहे. गेल्या अनेक वर्षापासून हा महिला दिन साजरा होत असून महिला सबलीकरण सशक्तीकरणाचा दिवस आहे. आज शाळेमध्ये माता पालकांना बोलावून त्या माता पालकांचा विशेष सन्मान केला व रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून अनेक विषयांवर हात घातला ही शाळेच्या दृष्टीने उल्लेखनीय गोष्ट आहे. भविष्याच्या दृष्टीने विचार केला तर आपण शिकलो सज्ञान झालो यापुढे पुढच्या पिढीला शेवटपर्यंत शिक्षण कसे मिळेल यासाठी आपण जबाबदारी घेणे गरजेचे असल्याचे सांगून महिला पालकांनी मुलांबरोबर आरोग्याची काळजी घेतली पाहिजे कारण सद्यस्थितीला भारतातील पन्नास टक्के स्त्रियांना हिमोग्लोबिनची कमतरता असल्याचे दिसून येत आहे.

## जिल्हा परिषद शाळेत कर्तृत्ववान मातांचा सन्मान

| नेरळ | प्रतिनिधी |

उपक्रमशील शाळा झुगरे वाडी येथे रविवारी महिला दिनाचे औचित्य साधून, रानावनात तसेच वीटभट्टी वर शेतात ऊन वारा, पाऊस यांची तमा न बाळगता सतत कष्ट करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. आज रायगड जिल्हा परिषदेच्या झुगरेवाडी शाळेत मोठया उत्साहात आणि महिलांचे उपस्थितीत साजरा करण्यात आला.

कुटुंब आणि समाज यांच्यासाठी सदैव स्वतः च्या भावनांना मुरड घालून, स्वतः दुर्लक्षित राहून आपल्या मुलांनी, मुलींनी चांगले शिक्षण घेऊन समाजाचा नावलौकिक वाढवावा यासाठी सदैव तत्पर असणाऱ्या माता पालक, जेष्ठ माता यांचा सन्मान राजश्री पाटील, रोहिणा वाघ, दर्शना ठोंबरे, राधिका, यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या कुटुंबाला आधार देणाऱ्या माता, बहीण, आत्या, यांच्याविषयी आदराची भावना निर्माण होणार आहे.या कार्यक्रमास लक्ष्मण पादिर, जनार्दन निरगुडा, माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते

राजश्री पाटील यांनी महिलांच्या जीवनात सदैव कष्ट असतात, परंतु आपल्या माणसाने आपला सन्मान केला तर त्याचे सुख काही औरच असते, महिला घरात जे काम करत असते ते दिसून येत नाही त्यामुळे आपले काम कमी आहे असे आपण समजू नये, असा मोलाचा सल्ला राजश्री पाटील यांनी दिला.

## करंजाडेत आरोग्य शिबिराचे आयोजन

| पनवेल | प्रतिनिधी |

जागतिक महिला दिनानिमित्त शिवसेना वैद्यकीय कक्ष करंजाडेच्या वतीने आरोग्य शिबीर आयोजित केले होते. नागरिकांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाला विनोद साबळे, सायली सरक, मिरेंद्र शहारे, राजू नलवडे, महिला शहरप्रमुख अंजू सिंह, सदस्य प्रीती शहारे, राजश्री साबळे, उर्मिला धुमाळ, साहिल नाईक, विभागप्रमुख रवी पाटील, राहुल सुखसे आदी उपस्थित होते. विविध आजारांची तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्यविषयक मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. या शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, नेत्र तपासणी तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. उपस्थित डॉक्टरांनी नागरिकांना योग्य आहार, नियमित व्यायाम आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले.

### खोपोली पोलीस स्टेशनचा उपक्रम | महिला सक्षमीकरणाचा दिला संदेश

# खोपोलीत नारीशक्तीचा अभूतपूर्व गौरव सोहळा

| खोपोली | प्रतिनिधी |

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत खोपोली पोलीस स्टेशनच्या वतीने शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा अभूतपूर्व सन्मान करण्यात आला. नगरपरिषदेच्या नगरसेविका, डॉक्टर्स, परिचारिका, सामाजिक कार्यकर्त्या, महिला पोलीस कर्मचारी, महिला पत्रकार, महिला सफाई कामगार, महिला खेळाडू तसेच आदिवासी महिला भाजीविक्रेत्या अशा विविध स्तरातील महिलांचा यावेळी पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे दिव्यांग मुला–मुलींना सन्मानपूर्वक आमंत्रित करून त्यांचे कौतुक करण्यात आले. छोटेखानी पण अत्यंत हृद्य अशा स्वागत आणि सन्मान सोहळ्याने उपस्थित महिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाची झलक दिसून आली.

महिला दिनानिमित्त खोपोली पोलीस स्टेशनचा प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण यांच्याकडे प्रतीकात्मक चार्ज सोपविण्यात आला आणि पोलीस स्टेशनमधील सर्व महत्त्वाच्या जबाबदाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी समर्थपणे सांभाळल्या. यासोबतच उपस्थित महिलांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन देखील करण्यात आले होते.

यावेळी पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी सांगितले की, नारी शक्ती ही समाजाची जननी आणि भगिनी या दोन्ही स्वरूपात महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असते. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात महिलांचे स्थान अमूल्य आणि कायमस्वरूपी असते; मात्र जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने त्यांचा सन्मान करण्याची संधी मिळाल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला. तसेच रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या कार्यशैलीतून प्रेरणा घेत महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

प्रभारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण यांनी आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडण्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच दिलेल्या सन्मानाबद्दल त्यांनी मनापासून कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमाला शहरातील शेकडो महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पोलीस स्टेशनमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली होती. सर्व महिलांचे सुहास्य वदनाने आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात येत होते. विशेषत: दिव्यांग मुला–मुलींच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि समाधान हा या कार्यक्रमाचा खरा यशस्वी क्षण ठरला.

# उरण उपजिल्हा रुग्णालयाला सीआरझेडच्या मंजुरीची प्रतीक्षा

## वन विभागाकडून हिरवा कंदील; सोळा वर्षांनंतरही आरोग्यसेवा कोलमडलेलीच

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणच्या उपजिल्हा रुग्णालयाला वन विभागाकडून परवानगी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला तरीही येथील भूखंडाला सीआरझेडची मंजुरी मिळण्याची प्रतीक्षा कायम आहे. त्यामुळे १६ वर्षांनंतरही उरणमधील आरोग्यसेवा कोलमडलेलीच असून प्रत्यक्ष रुग्णालयाला आणखी किती वेळ लागेल, याबाबत शंका व्यक्त होत आहे. उरणमध्ये शंभर खाटांचे रुग्णालय मंजूर झाले आहे.

या रुग्णालयासाठी मिळालेल्या भूखंडाला सीआरझेडची मंजुरी न मिळाल्याने हे रुग्णालय रखडले आहे. मात्र वन विभागाची परवानगी मिळणार असल्याने उरणच्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तब्बल १६ वर्षे होऊनही उरणकरांसाठी आवश्यक असलेल्या उपजिल्हा रुग्णालयाचे काम सुरू झालेले नाही. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

वर्षभरापूर्वी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या रुग्णालयाचे भूमिपूजन करण्यात आले. त्या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने लवकरात लवकर रुग्णालयाचे काम सुरू करणार असल्याचा दावा केला होता. मात्र आजपर्यंत कामाला सुरुवात झालेली नाही.

उरणमधील नागरिकांना प्राथमिक आरोग्यसेवेसाठी नवी मुंबई महानगरपालिका तसेच पनवेलमधील उपजिल्हा व न परवडणाऱ्या खासगी रुग्णालयावर अवलंबून राहावे लागत आहे. या रुग्णालयाच्या उभारणीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. त्यांच्या माहितीनुसार रुग्णालयाच्या नवीन आराखड्याच्या मंजुरीची प्रतीक्षा आहे.

२०१० मध्ये उरणमधील अनेक सामाजिक संस्था आणि राजकीय संघटनांनी येथील अपघात आणि रुग्णाचे होणारे हाल या विरोधात केलेल्या आंदोलनानंतर शासनाने २०१० मध्ये उरणमध्ये १०० खाटांचे रुग्णालय उभारण्याला प्रशासकीय मंजुरी दिली. त्यानंतर गेल्या पंधरा वर्षांपासून हे रुग्णालय कोणत्या ना कोणत्या कारणामुळे रखडलेले आहे.

### भूमिपूजन सोहळा केवळ दिखाऊपणा

भूमिपूजन केल्यानंतर निवडणुका आल्याने या संदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. निवडणुकीपूर्वीचा भूमिपूजन सोहळा केवळ दिखाऊपणा होता का? असा सवाल आता उरणच्या नागरिकांकडून केला जात आहे.

> "उरणच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामासाठी किनारा नियमन (सीआरझेड)ची परवानगी आवश्यक असून त्यासाठीचा अर्ज दाखल करण्यात आला होता. यातील वन विभागाची मंजुरी सोमवारी मिळणार आहे. त्यानंतर सीआरझेड मंजुरीसाठी हा प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त अभियंता नरेश पवार यांनी दिली."

या रुग्णालयासाठी सिडकोच्या माध्यमातून उरण-पनवेल मार्गावरील वायू विद्युत केंद्राच्या कामगार वसाहतीशेजारी भूखंड दिला आहे. रुग्णालयासाठी निधीही मंजूर झाला होता. मात्र सीआरझेडमुळे हे रुग्णालय रखडले होते.

### कर्मचारी निवासांचे नियोजन

रुग्णालयासाठी सिडकोने दिलेला हा भूखंड सीआरझेडमध्ये मोडत असल्याने या रुग्णालयाचा आराखडा बदलण्यात आला आहे. यापूर्वी आराखड्यात या भूखंडावर रुग्णालय आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासी संकुले बांधण्यात येणार होती. मात्र हा भूखंड सीआरझेडच्या कचाट्यात अडकल्यामुळे येथे फक्त रुग्णालयासाठीच जागा उरली आहे. त्यामुळे हा आराखडा बदलण्यात आला. नवीन आराखड्यानुसार बोकडवीरा येथील भूखंडावर तळमजल्यासह चार मजली इमारत उभारण्यात येणार आहे. या इमारतीमध्ये 100 खाटांचे रुग्णालय असणार आहे, तर इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाच्या बाजूला असलेल्या भूखंडावर कर्मचाऱ्यांसाठी तीन इमारती बांधण्यात येणार आहेत. टी-१ मध्ये १० निवासी खोल्या, टी-२ मध्ये २८ निवासी खोल्या आणि टी-३ मध्ये ९ निवासी खोल्या आणि अधिकाऱ्यासाठी १ निवास असणार आहे. यासाठी ८४.५४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

# लोकगीतांच्या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद

## मनोरंजनाबरोबर समाज प्रबोधन करणारा कार्यक्रम

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शाहीर रामानंद उगले यांच्या पोवाडा व लोकगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन, विंधणे येथे शिवजयंतीच्या निमित्ताने शुक्रवारी (दि.६) करण्यात आले होते. या कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या श्रद्धास्थानाचा इतिहास शिवप्रेमींबरोबरच समस्त तरुणाईला प्रेरणादायी ठरावा, यासाठी विंधणे येथील फ्रेंड्स फॉर एव्हर सेवाभावी संस्थेच्या अथक प्रयत्नातून तसेच ग्रामस्थांच्या लोकवर्गणीसह, लोकप्रतिनिधी, विविध कंपन्या, संघटना, संस्था, उद्योजक कामगार या दानशूरांच्या सहभागातून, उरण तालुक्यातील विंधणे गावाच्या प्रवेशद्वाराजवळ श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ भव्य शिवस्मारक उभारण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला गुरुवारी (दि.५) विविध क्षेत्रा-तील मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यानिमित्ताने दोन दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शाहीर रामानंद उगले आणि त्यांच्या सहकारी मंडळीने पोवाड्यासह लोकगीतांचा कार्यक्रम सादर केला.

यात प्रत्येक महाराष्ट्रीय व्यक्तीचा ऊर अभिमानाने भरून यावा, अर्थात ज्या महाराष्ट्र गीताने इतिहास रचला.

अशा महाराष्ट्र गीताच्या सादरीकरणाबरोबर छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ यांच्या पराक्रमाची गाथा सांगणारे, वीर रसातील पोवाडे शाहीर रामानंद उगले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रभावी व खड्या आवाजातून सादर केले.

जोशपूर्ण पोवाडे व लोकगीते ऐकताच, भेकडांच्या अंगी चैतन्याचा संचार व्हावा, असे इतिहासातील घटनांचे वर्णन करताना रसिकांना रंजनाबरोबर समाज प्रबोधन झाले. भारुडातून रसिकांचे मनोरंजन करत असताना, शाहिरांनी लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजनही घातले.

शिवजयंतीच्या दिवशी शिवाजी राजांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक आणि या मिरवणुकीत तरुणांसह अबाल वृद्ध व लहान मुले सहभागी झाली होती.

शिवस्मारकाच्या लोकार्पण सोहळ्यानिमित्ताने काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, उद्योजक अश्वित थळी, राजिप सदस्य अविनाश ठाकुर, पनवेल पंचायत समितीचे सदस्य मयूर शेलार, नरेश पाटील, जयराम पाटील, रवी घरत, वामन पाटील, संजय केणी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

# शतक महोत्सवी चवदार तळे सत्याग्रह वर्धापन दिन

**। महाड। प्रतिनिधी ।**

महाड चवदार तळे सत्याग्रहाचा ९९ वा वर्धापन दिन आणि पुढल्या वर्षी येणारा शतक महोत्सवी वर्धापन दिन आंबेडकरी विचारांचे राजकीय पक्ष आणि संघटनांनी एकत्रितपणे साजरा करावा, अशी मागणी महाड येथील पत्रकार आणि मराठी पत्रकार परिषदेचे कोकण विभाग सचिव मनोज खांबे यांनी केली आहे.

या मागणीचे पत्र त्यांनी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नेते प्रा जोगेंद्र कवाडे, भारतीय रिपब्लिकन सेनेचे नेते आनंदराज आंबेडकर, रिपब्लिकन पार्टी गवई गटाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र गवई यांना पाठविले आहे.

या पत्रात श्री. खांबे यांनी नमूद केले आहे की, २० मार्च १९२७ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथील ऐतिहासिक चवदार तळ्यावर पिण्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह केला होता. जात, धर्म आणि वर्णभेदाच्या विरोधात समान हक्कांसाठी झालेला हा सत्याग्रह जगभरात मानवतेचा संदेश देणारा ठरला.

सन २०२७ मध्ये चवदार तळे सत्याग्रहाला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. २० मार्च २०२६ पासून या शताब्दी वर्षास प्रारंभ होणार आहे. आजपर्यंत विविध आंबेडकरी संघटना, संस्था आणि राजकीय पक्ष स्वतंत्र व्यासपीठांवर वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करत असल्यामुळे समाजात एकात्मतेचे चित्र दिसून येत नाही, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर शतकमहोत्सवी वर्षाच्या सुरुवातीलाच हे चित्र बदलण्यासाठी सर्व आंबेडकरी संघटना, संस्था आणि राजकीय पक्षांनी एकत्र येऊन एक सभा एक व्यासपीठ या संकल्पनेतून कार्यक्रम आयोजित करावा, अशी भूमिका खांबे यांनी मांडली आहे.

यामुळे आंबेडकरी समाजाची एकता देशासमोर येईल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खऱ्या अर्थाने अभिवादन ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# म्हसळ्यात रंगपंचमी साजरी

**म्हसळा :** म्हसळा कुंभार समाजाच्या वतीने पारंपरिक पद्धतीने लहान मुलांतून राधा-कृष्ण, सुदामा, पेंद्या अशाप्रकारची ऐतिहासिक व्यक्तीरेखा रेखाटून बैलगाडीमध्ये रथ तयार करून त्यांची संपूर्ण शहरभरातून मिरवणूक काढण्यात आली. शेवटी हा रथ धावीर देव विराजमान झालेल्या ठिकाणी विसर्जित करण्यात आला. हिंदु ग्रामस्थ मंडळ, म्हसळा आयोजित कुंभार आळीच्या बालकलाकारांची विशेष 'रंगपंचमी गाडी' म्हसळा शहराच्या सांस्कृतिक परंपरेचा वारसा जपत, सजवलेल्या गाडीतून आनंदाची उधळण करण्यासाठी सज्ज झालेले बालगोपाल पाहवयास मिळाले.

# बालविवाहाविरोधात जनजागृतीचा निर्धार

## पालक-युवकांचा उत्स्फूर्त सहभाग; मार्गदर्शन व समुपदेशन शिबीर संपन्न

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

समाजामध्ये बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने अश्वपरीस फाऊंडेशन, खोपोली यांच्या पुढाकारातून महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, अलिबाग, कर्जत, खालापूर व चौक पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोंडेवाडी, कर्जत खालापूर येथे मार्गदर्शन व समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले.



आजही अपुऱ्या शिक्षणामुळे व सामाजिक जागरूकतेच्या अभावामुळे अनेक ठिकाणी बालविवाहाची प्रकरणे घडताना दिसतात. अशा घटनांमुळे कायद्याअंतर्गत गुन्ह्यांची नोंद होऊन संबंधित कुटुंबांना आर्थिक, शारीरिक तसेच मानसिक अशा विविध समस्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः आदिवासी समाजात अशा घटना टाळण्यासाठी व्यापक जनजागृतीची गरज असल्याचे मत अश्वपरीस फाऊंडेशनच्या अध्यक्षा इशिका शेलार यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमादरम्यान बालहक्क आणि त्यासंबंधित कायदे याबाबत उदाहरणांसह सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बालविवाहाचे सामाजिक व आरोग्यविषयक दुष्परिणाम, त्याविरोधातील कायदेशीर तरतुदी तसेच अशा प्रकरणांमध्ये नोंद होणाऱ्या गुन्ह्यांबाबत माहिती देऊन उपस्थितांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.

याशिवाय महिलांवर होणारे अत्याचार, न्यायालयीन प्रक्रिया तसेच महिलांना उपलब्ध असलेल्या संरक्षणाच्या कायदेशीर उपाययोजनांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. आदिवासी बांधवांच्या विविध सामाजिक समस्याही यावेळी ऐकून घेण्यात आल्या. कागदोपत्री प्रक्रियेमध्ये येणारे अडथळे, न्याय मिळण्यात होणारा विलंब तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळविताना येणाऱ्या अडचणी यावरही चर्चा करण्यात आली.

# बार्डी गावात पाणीटंचाईचा गंभीर

## ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चिंचवली अंतर्गत येणाऱ्या बार्डी गावामध्ये मागील एक ते दीड वर्षापासून पाणीपुरवठा अत्यंत अनियमित होत आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे आणि त्यामुळे नळपाणी योजना सुरळीत झाली नाही तर ग्रामपंचायत आणि नंतर पंचायत समिती कार्यालयावर मोर्चा नेण्याचा इशारा देण्यात आला आहे.

चिंचवली ग्रुप ग्रामपंचायत पाणी योजनेअंतर्गत बार्डी गावाला पाणीपुरवठा केला जातो. मात्र सध्या चार-चार, पाच-पाच दिवसांनीच नळांना पाणी येत असून, त्यातही पाण्याचा दाब इतका कमी असतो की एक हंडाभर पाणी भरण्यासाठी अर्धा ते पाऊण तास वेळ लागत आहे. या गंभीर समस्येबाबत बार्डी ग्रामस्थांनी आतापर्यंत अनेक वेळा ग्रामपंचायत प्रशासनाकडे लेखी तक्रारी केल्या आहेत. तसेच ग्रामसभेमध्येही वारंवार हा विषय मांडण्यात आला आहे. मात्र ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस व कायम स्वरूपी कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याशिवाय पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना देखील लेखी अर्ज देऊन प्रत्यक्ष भेट घेऊन पाणीटंचाईची समस्या निदर्शनास आणून देण्यात आली होती.

दरम्यान, बार्डी गावाकडे येणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर ग्रामपंचायत प्रशासनाच्या माध्यमातून अनेक अनधिकृत जलजोडण्या दिल्या गेल्याचा गंभीर आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. या अनधिकृत नळजोडण्यांमुळे पाणीपुरवठ्यावर मोठा परिणाम होत आहे.प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची चौकशी करून बार्डी गावातील पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास येत्या काळात पंचायत समिती कार्यालयासमोर बार्डी ग्राम स्थांच्या वतीने मोठे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत ही आमचे आशिल श्री. राहुल जनार्दन जाधव, रा. फ्लॅट नं. ६०१, बिल्डिंग नं. ५, वेलेन्टाईन अपार्टमेन्ट, वॉटर टॅंक रोड ऑफ फिल्म सिटी रस्ता दिंडोशी शेजारी, पिपरी पाडा, मुंबई, मालाड ईस्ट ०९७, यांनी सदर जमिनीचे विद्यमान मालक श्रीम. दिपाक्षी अमोल पाटील, श्री. अमेय अमोल पाटील व श्री. अशीतोष अमोल पाटील सर्व रा. चौल, शितळादेवी मंदीराजवळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले असून सदर मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. | क्षेत्र (है. आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| चौल, ता.अलिबाग, जि.रायगड | २३१०/३ | ०-४८-६०<br>पो.ख ०-०४-८०<br>एकुण ०-५३-४० | २७-६० |

सदर मिळकती पैकी श्रीम. दिपाक्षी अमोल पाटील वगैरे यांचे हिश्याच्या ०-२०-२० हे. आर क्षेत्रा पैकी ०-१०-१० हे. आर क्षेत्राची बागायती मिळकत

उपरोक्त वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याबाबत सदर मिळकतींच्या मालकांचे म्हणणे आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्यूपत्र साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत, खरेदीदार व खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो आमच्या आशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे,

ठिकाण: अलिबाग,
दिनांक ०८/०३/२०२६

**ॲड. गौरव मधुकर पाटील**
ए २०१ वसंत पुष्प अपार्टमेंन्ट,
पंजाब नॅशनल बँकच्या वरती,
ता. अलिबाग, जि. रायगड,

### PUBLIC NOTICE

Public Notice is hereby given that the Land Owner-Poonam Rajesh Joshi, owns & possess landed property and needs to publish Public Notice in the Daily Newspaper and accordingly invites any demands, claims, objections in respect of the property given below:-

**Village-Sainagar, Taluka- Khalapur, District-Raigad**

| Gut/Survey No. | Area (H.R.Pt.) | Assessment Rs.-Ps. |
|---|---|---|
| New No. 28/2/B (old S. No. 53/2/B) | Irrigated-0-74-20<br>Class- 0-05-10<br>Total- 0-79-30 | 10-74 |
| New No. 28/3 (old S. No.53/3) | Irrigated- 0-31-10<br>Class- 0-07-60<br>Total- 0-38-70 | 6-25 |
| New No. 28/4 (old S. No. 53/4) | Irrigated- 0-33-10<br>Class - 0-03-80<br>Total - 0-36-90 | 5-75 |
| New No. 30 (old S. No.55) | Irrigated- 0-68-60<br>Class- 0-06-80<br>Total- 0-75-40 | 10-25 |
| New No. 3 E/2 (old S. No. 28 E/2) | Irrigated-0-28-40<br>Class- 0-78-10<br>Total - 1-06-50 | 0-34 |
| New No. 3E/3/A (old S.No.28 E/3/A) | Irrigated- 0-49-40<br>Class- 0-07-40<br>Total - 0-56-80 | 7-81 |

Any person having any claim in respect thereof by way of sale, agreement for sale, memorandum of understanding, promissory note, exchange, gift, mortgage, charge, interest, lease, lien, possession or interest of whatsoever and if any suit or proceeding is pending in any Civil Court or Tenancy Court or any other Court of Law in respect of the abovesaid lands, the concern person/s is/are hereby requested to inform the same in writing with prima-facie documentary evidence if any, to the undersigned within a period of 14 days from date of publication of this notice, failing which all the claim/s if any of such person/s shall be considered to have been waived and or abandoned and my client will complete the formalities of transfer and execution of Deed of Sale-Cum- Conveyance in our client's favor. Objection raised after completion of 14 days period shall not be binding on client.

Date: 28/02/2026
Place: Panvel
Land Ownr signature
For Publish Notice

**ADV. SAJID M. SHAIKH**
Shop No. 4, Sameer Apt.,
Waji Mohalla, Panvel,
Tal. Panvel, Dist. Raigad.

# खांब येथे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज बिजोत्सव सोहळा भक्तीभावाने साजरा

**। खांब । प्रतिनिधी ।**

पंचक्रोशी वारकरी संप्रदायाचे वतीने गेल्या अनेक वर्षांची यशस्वी परंपरा कायम राखत याही वर्षी संतश्रेष्ठ तुकाराम महाराज बिजोत्सव सोहळा मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला.

या बिजोत्सव सोहळ्यातंर्गत सकाळी नामावली व गाथा भजन, गाथा मूर्ती भूषण वरखले यांची हरिकिर्तनरूपी सेवा, दुपारी महाआरती व महाप्रसाद तर हरिपाठ व जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले. या सर्व कार्यक्रम प्रसंगी खांब पंचक्रोशीतील सर्वच गावांमधील मोठ्या संख्येने भाविक भक्त व भगिनी यांनी उपस्थिती नोंदवून विविध प्रकारच्या कार्यक्रमांचा लाभ घेतला.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल सौ.अदिती प्रशांत डेरे यांनी खाली नमुद केलेली बिनशेती मिळकत जमीन मिळकतीचे मालक सौ. सविता सनी डिका, राहणार मौजे भिसेगाव, ता. कर्जत,जि. रायगड, पिन कोड ४१०२०१ यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड | १०/३४ | ४.२७.५४ | ४३.०० |

वरील वर्णनाच्या बिनशेती जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. ०९.०३.२०२६

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा.शॉप नं.२ पाल टॉवर भिसेगाव ता. कर्जत
जि. रायगड. मो. नं. ९३०७८८५७११

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक **रविना रविंद्र भुसारी** यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे-दहिगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत.**

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| २८ | ४ | ०-०४-००<br>पो.ख. ०-००-३० | ०-१० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता :- २,'लक्ष्मी सदन', जुने एस.टी.स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. भरत शिवाजी गोपाळे यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे चांदई, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ६९/५ एकुण ०.१४.७० गुंठे जमिन मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा,बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनाक ०९/०३/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो. कडाव, ता.कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक सुहासिनी सतिष सोनावळे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ४३ | २ | एकुण क्षेत्र ०-६४-०० पैकी विकत देणार यांचे मालकी क्षेत्र ०-३२-०० पैकी विक्री केलेले क्षेत्र ०-१६-०० | १-१४ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०९/०३/२०२५

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्हयू
बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत,जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने - नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## ऐतिहासिक विजेतेपदावर भारताचे 'लक्ष्य'

**नवी दिल्ली :** लक्ष्य सेन याच्याकडे प्रकाश पदुकोण व पुलेला गोपीचंद यांच्यानंतर ऑल इंग्लंड अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धा जिंकण्याची संधी असणार आहे. भारताचा अनुभवी खेळाडू लक्ष्य सेन याने शनिवारी (दि.७) झालेल्या उपांत्य फेरीच्या लढतीत कॅनडाच्या व्हिक्टर लाई याच्यावर तीन गेममध्ये विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली आहे. लक्ष्य सेन याने २०२२मध्ये या



प्रतिष्ठेच्या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती; मात्र, व्हिक्टर एक्सेलसन याच्याकडून त्याला पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. लक्ष्य सेन याला गेल्या काही महिन्यांमध्ये सूर गवसलेला नाही; मात्र, ऑल इंग्लंड अजिंक्यपद स्पर्धेमध्ये त्याच्याकडून छान कामगिरी होत आहे. लक्ष्य सेन याने उपांत्य फेरीच्या लढतीतील पहिल्या गेममध्ये व्हिक्टर लाई याला २१-१६ असे पराभूत केले. त्यानंतर कॅनडाच्या खेळाडूने पुनरागमन करताना २१-१८ अशी बाजी मारली. अखेरच्या गेममध्ये लक्ष्य सेन याने आपला खेळ उंचावला व २१-१५ असे यश मिळवले. भारताच्या खेळाडूने एक तास व ३७मिनिटांमध्ये बाजी मारली. आता जेतेपदाच्या लढतीत त्याच्यासमोर चीन तैपईच्या लीन चून यी याचे आव्हान असणार आहे. चीन तैपईच्या खेळाडूने उपांत्य फेरीच्या लढतीत कुनलावूत वितीदसर्ण याच्यावर २१-१४, १८-२१, २१-१६ अशी एक तास व १८ मिनिटांमध्ये मात केली.

## आयसीसीवर दुजाभाव केल्याचा आरोप

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषक स्पर्धेतून बाहेर झाल्यानंतरही वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेचे संघ भारतातच आडकले आहेत. मात्र, इंग्लंड संघ सर्वात शेवटी बाहेर पडूनही तो मायदेशी परतला आहे. त्यामुळे आयसीसी विरोधात मोठा वाद पेटला असून दुजाभाव करत असल्यचा अरोप या दोन्ही संघाकडून केला जात आहे.वेस्ट इंडिज संघ १ मार्च रोजी भारताविरुद्ध सुपर-८ सामन्यात पराभूत झाल्यानंतर या स्पर्धेतून बाहेर झाला. तसेच, ४ मार्च रोजी दक्षिण आफ्रिका संघ उपांत्य फेरीत पराभूत झाल्यानंतर स्पर्धेतून बाहेर झाला. तसेच इंग्लंड संघ ५ मार्च रोजी भारताविरुद्ध उपांत्य सामन्यात पराभूत झाला. मात्र ही स्पर्धा अखेरच्या टप्प्यात येत असतानाच अमेरिका, इस्त्राईल आणि इराण यांच्यात युद्ध सुरू झाले. त्याचा परिणाम आखाती देशांमध्ये होताना दिसत आहे. या युद्धजनक परिस्थितीमुळे विमान सेवा प्रभावित झाल्या आहेत. अशात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून क्रिकेट बोर्ड्स, संबंधित सरकारी अधिकारी आणि एअरलाईन पार्टनर्ससोबत काम करून सर्व संघांना सुरक्षित आपापल्या मायदेशी पाठवण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचदरम्यान, पहिल्या फेरीत बाहेर पडलेले संघ मायदेशी परतले आहेत. सुपर- ८ मधूनही बाहेर पडलेले संघ मायदेशी परतले आहेत, याला वेस्ट इंडिज अपवाद आहे. इंग्लंड संघ सर्वात शेवटी बाहेर पडूनही लवकर मायदेशी रवाना झाला आहे. मात्र, वेस्ट इंडिज संघ आठवडा झाला तरी भारतात आडकला आहे. तसेच, दक्षिण आफ्रिका संघही अद्याप भारतातच आहे. त्यामुळे सध्या आयसीसीवर दुजाभाव केल्याचा आरोप होत आहे. यादरम्यान, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेचे अनेक खेळाडू आयसीसीकडे मायदेशी पुन्हा जाण्यासाठी विनंती करत आहेत. वेस्ट इंडिजचा मुख्य प्रशिक्षक डॅरेन सॅमीने भावनिक पोस्ट शेअर करत ईश्वराकडे या परिस्थितीतून बाहेर काढण्याची विनंती केली आहे.

## विजेत्या संघावर पैशांचा पाऊस

**नवी दिल्ली :** भारत विरूद्ध न्यूझिलंड या अंतिम सामन्यातील विजय केवळ प्रतिष्ठेचाच नाही तर आर्थिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने जाहीर केलेल्या माहितीनुसार, टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या संघाला ३ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे २७ कोटी रुपयांचे बक्षीस मिळणार आहे. त्यामुळे, विजेत्या संघासाठी हे मोठे उत्पन्न ठरणार आहे. तसेच, उपविजेत्या संघालाही चांगली रक्कम मिळणार आहे. अंतिम सामन्यात पराभूत होणाऱ्या संघाला सुमारे १४ कोटी ६५ लाख रुपये बक्षीस म्हणून दिले जाणार आहेत.

# ऑस्ट्रेलियाचा भारतावर दणदणीत विजय

## कर्णधार एलिसा हेलीला विजयी निरोप

**| पर्थ | वृत्तसंस्था |**

पर्थमध्ये भारतीय महिला संघाविरुद्ध पार पडलेल्या एकमेव दिवस-रात्र कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या दिवशी रविवारी (दि.८) १० गडी राखत दणदणीत विजय मिळवला आहे. तसेच, या सामन्यादरम्यान ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट संघाने कर्णधार एलिसा हेलीला विजयी निरोप दिला. हा सामना एलिसा हेलीलाचा ऑस्ट्रेलियासाठी अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना होता. दरम्यान, तिला सामन्यानंतर ॲश्ले गार्डनर आणि एलिसा पेरी यांनी मैदानात खांद्यावर उचलून घेत फिरवले.



या सामन्यात भारतीय संघाला दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलिया समोर २५ धावांचेच लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग ऑस्ट्रेलियाने ४.३ षटकातच बिनबाद २८ धावा करत पूर्ण केले. ऑस्ट्रेलियाकडून जॉर्जिया वॉल १६ धावांवर आणि फोबी लिचफिल्ड ११ धावांवर नाबाद राहिली. ततेपुर्वी, या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात ६२.४ षटकात सर्वबाद १९८ धावा केल्या होत्या. भारताकडून जेमिमाह रोड्रिग्सने ५४ धावांची खेळी केली होती; तर, शफाली वर्माने ३५ आणि काशवी गौतमने नाबाद ३४ धावा केल्या होत्या. बाकी कोणाला २० धावांचा टप्पाही पार करता आला नव्हता. ऑस्ट्रेलियाकडून ॲनाबेल सदरलँडने सर्वाधिक ४ बळी, लुसी हॅमिल्टनने ३ बळी, डार्सी ब्राऊनने २ बळी, तर ॲश्ले गार्डनरने १ बळी घेतला. त्यानंतर ऑस्ट्रेलिया संघाने पहिल्या डावात ९०.४ षटकात सर्वाबद ३२३ धावा करत १२५ धावांची आघाडी घेतली. या डावात ॲनाबेल सदरलँडने गोलंदाजीनंतर फलंदाजीतही कमाल करताना १२९ धावांची शतकी खेळी केली. तसेच, एलिस पेरीने ७६ धावा केल्या.

कर्णधार एलिसा हेली मात्र तिच्या शेवटच्या डावात १३ धावांवर बाद झाली. ॲलना किंगने २१ आणि लुसी हॅमिल्टनने २३ धावांचे योगदान दिली. भारताकडून गोलंदाजी करताना सायली सतघरे चमकली. तिने ४ बळी घेतले. तसेच, क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. तर, स्नेह राणा आणि शफाली वर्मा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. दुसऱ्या डावात भारतीय संघ ४८.२ षटकात १४९ धावांवरच बाद झाला. त्यामुळे भारताला ऑस्ट्रेलियासमोर २५ धावांचेच लक्ष्य ठेवता आले. या डावात प्रतिका रावलने ६३ धावा केल्या, तर स्नेह राणाने ३० धावांची खेळी केली. बाकी कोणी १५ धावांचा टप्पाही पार करू शकले नाहीत. ऑस्ट्रेलियाकडून लुसी हॅमिल्टनने ३ बळी घेतले, तर ॲनाबेल सदरलँड, ॲलना किंग, ॲश्ले गार्डनर यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. तसेच, डार्सी ब्राऊनने १ बळी घेतला. एलिसा हेलीलाने निवृत्ती घेणार असल्याची घोषणा यापूर्वीच केली होती. त्यामुळे तिच्यासाठी हा भावनिक सामनाही होता. या सामन्याच्या अंती हेलीला विजयी निरोप देण्यात आला.

### हेलीलाची कारकीर्द

**२०१०मध्ये वयाच्या १९व्या वर्षी ऑस्ट्रेलियासाठी पदार्पण केलेल्या एलिसा हेलीने ११ कसोटी सामन्यात ३ अर्धशतकांसह ५०२ धावा केल्या आहेत. तसेच, १२६ एकदिवसीय सामन्यांमध्ये तिने ८ शतके आणि १९ अर्धशतकांसह ३,७७७ धावा केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये १६२ सामन्यांत तिने १ शतक आणि १७ अर्धशतकांसह ३०५४ धावा केल्या आहेत. ती महिला आणि पुरुष मिळून आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी घेणारी यष्टीरक्षक देखील आहे. तिने आंतरराष्ट्रीय संघात यष्टीरक्षक म्हणून १२६ बळी घेतले असून त्यात ६३ झेल आणि ६३ यष्टीचीतचा समावेश आहे. हेलीने तिच्या कारकिर्दीत एकूण ७ विश्वचषक जिंकले आहेत. ती २०१८ आणि २०१९ मध्ये आयसीसीची सर्वोत्तम महिला टी-२० खेळाडूचा पुरस्कार जिंकणारी खेळाडू आहे.**

# न्यूझीलंडच्या गोलंदाजाचा नवा विश्वविक्रम

## सलग पाच चेंडूत पाच बळी

**| नेपियर | वृत्तसंस्था |**

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज ब्रेट रँडेलने रविवारी (दि.८) सेंट्रल डिस्ट्रिक्ट्सकडून खेळताना नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट्च्या विरुद्ध प्लंकेट शील्ड सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्याने ५ चेंडूत ५ बळी घेतले आहेत. त्यामुळे २५४ वर्षांच्या प्रथम श्रेणीच्या क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारा तो पहिलाच गोलंदाज ठरला आहे.



सेंट्रल डिस्ट्रिक्ट्सने पहिल्या डावात सर्व गडी गमावत ३७३ धावा केल्या. त्यानंतर नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट्चा डाव सुरू असताना ब्रेटने त्याच्या दुसऱ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूत हेनरी कूपरला बाद केले. त्यानंतर तिसऱ्या षटकाच्या पहिल्या चेंडूत जीत रावलला तंबूचा रस्ता दाखवला. नंतर त्याने जो कार्टरला गोल्डन डकवर बाद करत हॅट्ट्रीक पूर्ण केली. पुढील दोन चेंडूमध्ये रॉबर्ट ओ डॉनेल आणि क्रिस्टियन क्लार्क यांचा बळी घेतला. ३० वर्षीय ब्रेटने त्याच्या चौथ्या षटकातही २ बळी घेतले. त्याने बेन पोमारे आणि स्कॉट कुगेलाइनला बाद केले. त्यामुळे त्याने ४ धावा देत तब्बल ७ बळी घेतले. त्यानंतर त्याने आणखी तीन षटके टाकली, मात्र त्याला एकही बळी मिळवता आला नाही. ब्रेटच्या जबरदस्त गोलंदाजीने नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट्चा डाव ८२ धावसंख्येवरच संपुष्टात आला. त्यामुळे त्याची ही कामगिरी सर्वोत्तम ठरली आहे.

# मिचेल सँटनरचे 'कॉपी-पेस्ट' विधान

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामन्याच्या आदल्या दिवशी झालेल्या पत्रकार परिषदेत भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांचे कर्णधार उपस्थित होते. यावेळी न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने पत्रकार परिषदेत म्हटले की, त्यांचा संघ चषक जिंकण्यासोबतच स्टेडियममधील प्रेक्षकांना शांत करण्याचा प्रयत्न करेल. सँटनरच्या या विधानावर जेव्हा सूर्यकुमार यादवला विचारण्यात आले, तेव्हा तो म्हणाला की, सगळे जण तीच एक ओळ चिकटवत आहेत. काहीतरी नवीन बोला. विशेष म्हणजे, २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यापूर्वी ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्सने देखील असेच विधान केले होते, असे तो म्हणाला.

# ठाण्यात अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

**| ठाणे | प्रतिनिधी |**

ठाणे जिल्हा कबड्डी असो. च्या विद्यमाने ॲड.पूजा ठाकूर यांच्या सहकार्याने पुरुष व महिला जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ठाण्यातील कळवा-खारेगाव येथील सह्याद्री हायस्कुलच्या समोरील खारलँड मैदानावर दि.९ ते १७ मार्च या कालावधीत सायंकाळी ५.०० ते ११.०० या कालावधीत हे सामने होणार आहेत.

यंदा राज्य संघटनेने पुन्हा 'एक जिल्हा एक संघ' ही संकल्पना राबविल्याने पुरुष संघाचा सहभाग मोठ्या प्रमाणात झाला आहे. या स्पर्धेत १३२ पुरुष, तर ४२ महिला संघ सहभागी झाले आहेत. ठाणे जिल्हा कबड्डी असो.



चे अध्यक्ष व ठाणे महानगर पालिकेचे उप महापौर कृष्णा पाटील व संघटनेचे कार्याध्यक्ष भरत पाटील यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्‌घाटन होणार आहे. या स्पर्धेची भाग्य पत्रिका सर्व संबंधित संघाना हस्ते परहस्ते पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. ज्या संघाना ती अद्याप मिळाली नसेल त्यांनी जिल्हा संघटनेच्या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. सर्व सहभागी संघानी आपणांस दिलेल्या वेळेत मैदानात उपस्थित राहून संघटनेस सहकार्य करावे, असे आवहान सचिव भोसले यांनी प्रसार माध्यमाद्वारे केले आहे.

# न्यूझीलंडच्या गोलंदाजाची निवृत्ती


**| वेलिंग्टन | वृत्तसंस्था |**

न्यूझीलंडच्या एका क्रिकेटपटूने अचानक निवृत्तीची घोषणा केली आहे. १५ वर्षाच्या कारकिर्दीनंतर या खेळाडूने एकदिवसीय क्रिकेटमधून संन्यास घेण्याचे ठरवले आहे. मात्र, टी-२० क्रिकेटमध्ये खेळणे सुरूच ठेवणार आहे. न्यूझीलंडच्या एका महिला क्रिकेटपटूने एकदिवसीय क्रकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. न्यूझीलंडची वेगवान गोलंदाज ली ताहुहू हीने एकदिवसीय क्रिकेट सोडण्याचा निर्णय घेतला आहे. तिने तिच्या १५ वर्षांच्या वनडे कारकिर्दीला निरोप दिला आहे; परंतु, ती टी-२० क्रिकेट खेळत राहणार आहे. तिचे न्यूझीलंड क्रिकेटमध्ये महत्वाचे योगदान राहिले आहे. ती न्यूझीलंडकडून वनडेमध्ये सर्वाधिक बळी घेणारी खेळाडू आहे. लीने वयाच्या २०व्या वर्षी २०११मध्ये वनडेमध्ये पदार्पण केले होते. त्या प्रकारामध्ये तिने १०३ सामने खेळताना १२५ बळी घेतले आहेत. ती १०० पेक्षा अधिक एकदिवसीय सामने खेळणाऱ्या १२ खेळाडूंपैकी एक आहे.

# उपांत्य फेरीने प्रसारणाचे विक्रम मोडले

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

टी-२० विश्वचषक स्पर्धे दरम्यान अनेक श्वास रोखायला लावणारे सामने पाहायला मिळाले. क्रिकेटप्रेमींनी या सामन्यांचा मनसोक्त आनंद देखील घेतला. काही सामन्यांनी तर प्रसारणाचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. जिओ हॉटस्टारने दिलेल्या माहितीनुसार, यंदाच्या स्पर्धेत भारत-इंग्लंड उपांत्य फेरी सामना सर्वाधिक पाहिला गेला. तर, भारत-पाकिस्तान हा सामना तिसऱ्या क्रमांकावर राहिला.




टी-२० विश्वचषकातील भारत-पाकिस्तानचा महामुकाबला १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियममध्ये खेळवण्यात आला होता. भारताने दिलेल्या १७५ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ २० षटके पूर्णही खेळू शकला नाही आणि ११४ धावांवर सर्वबाद झाला. या सामन्यात भारताच्या विजयाचा शिल्पकार ईशान किशन ठरला. याशिवाय भारत-वेस्ट इंडिज सामना हा या स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक पाहिला गेलेला सामना ठरला आहे. सुपर-८ फेरीतील भारत-वेस्ट इंडिज सामना 'व्हर्च्युअल क्वार्टर फायनल' मानला जात होता. या सामन्यात जिंकणाऱ्या संघालाच उपांत्य फेरीचे तिकीट मिळणार होते. वेस्ट इंडिजने दिलेल्या १९६ धावांचा पाठलाग करताना भारताच्या संजू सॅमसनच्या नाबाद ९७ धावांच्या शानदार खेळीच्या जोरावर भारताने हे लक्ष्य ४ चेंडू राखून आणि ५ गडी शिल्लक ठेवत गाठले. त्यानंतर भारत विरुद्ध इंग्लंड सामना हा आतापर्यंतचा सर्वाधिक पाहिला गेलेला सामना ठरला आहे. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळला गेलेला हा सामना व्ह्यूअरशिपचे सर्व विक्रम मोडणारा ठरला आहे. या सामन्यात दोन्ही संघांनी मिळून तब्बल ४९९ धावा केल्या होत्या. भारताने प्रथम फलंदाजी करत इंग्लंडसमोर २५४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. अंतिम सामना सामन्याला सर्वाधिक व्ह्यूज मिळण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे.

# 'नक्षत्र' इंटरकॉलेज स्पर्धांचा जल्लोष

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

खारघर येथील सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयात नुकत्याच वार्षिक 'नक्षत्र' इंटरकॉलेज स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. महाविद्यालय प्रशासन आणि स्टुडंट कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये सरस्वती महाविद्यालय ऑफ इंजिनिअरिंग खारघर, राजीव गांधी महाविद्यालय अंधेरी, प्रविण पाटील महाविद्यालय मिरा-भाईंदर, डी.वाय. पाटील आणि एसआयईएस महाविद्यालय नेरुळ



येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करत स्पर्धांमध्ये चांगलीच रंगत आणली. कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेल्या फॅशन शोस्पर्धेतस्पर्धकांनीआत्मविश्वासपूर्ण सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. या स्पर्धेतील विजेत्यांना 'मिस्टर नक्षत्र' आणि 'मिस नक्षत्र' या किताबांनी गौरविण्यात आले.

इंटरकॉलेज ग्रुप डान्स स्पर्धेत सरस्वती महाविद्यालयाचा वुल्फ पॅक ग्रुप, डी.वाय. पाटील महाविद्यालयाचा फूटलूज ग्रुप आणि एसआयईएस महाविद्यालयाचा मोक्ष ग्रुप यांनी सहभाग घेतला. रंगतदार सादरीकरणानंतर डी.वाय. पाटील महाविद्यालयाच्या 'फूटलूज' ग्रुपने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच, इंटरकॉलेज ग्रुप फॅशन शो स्पर्धेत राजीव गांधी महाविद्यालय, प्रविण पाटील महाविद्यालय, सरस्वती महाविद्यालय आणि तेरणा महाविद्यालय यांच्या संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करत सरस्वती महाविद्यालयाच्या 'टीम एबीसीडब्ल्यू'ने प्रथम क्रमांक मिळवला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वोत्कृष्ट विभाग चषकाची घोषणा करण्यात आली. यंदा सरस्वती महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागाने ही मानाची ट्रॉफी पटकावली. उत्साह, सर्जनशीलता आणि स्पर्धात्मकतेचा संगम ठरलेल्या 'नक्षत्र' इंटरकॉलेज स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ मिळाले. रंगतदार सादरीकरणे आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभागामुळे हा महोत्सव अविस्मरणीय आठवण ठरला.

# व्हॅनबरी लिमिटेड संघ अंतिम विजेता

**| रसायनी | प्रतिनिधी |**

पाताळगंगा आणि रसायनी इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या पुढाकाराने प्रिआ प्रीमियर लीग २०२६ या औद्योगिक क्रिकेट स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. नुकताच या स्पर्धेचा दिमाखदार समारोप सोहळा पार पडला. मोहोपाडा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्सच्या भव्य आणि सुसज्ज स्टेडियमवर या सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते.



या उपक्रमाला परिसरातील उद्योगांनी भरघोस प्रतिसाद दिला असून, एकूण २४ संघांनी यात उत्साहाने सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचा अंतिम सामना अत्यंत अटीतटीचा झाला. ही अंतिम लढत व्हॅनबरी लिमिटेड आणि प्रसोल केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात रंगली. या रोमांचक सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत व्हॅनबरी लिमिटेड संघाने विजेतेपद पटकावले. तर, प्रसोल केमिकल्स संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत बकुल ॲरोटिक्स संघाने तृतीय स्थान पटकावले. स्पर्धेचचा सांगता समारंभ आणि बक्षीस वितरण सोहळा रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

**चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन | स्पर्धेत प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन**

# बागमळा संघ विजेतेपदाचा मानकरी

**| चौल | विशेष प्रतिनिधी |**

चौल येथील एकविरा भगवती मंडळ दिलसे ग्रुप यांच्यावतीने एकविरा भगवती चौल नाईट अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा यंदाही मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. परिसरातील क्रिकेटप्रेमींसाठी आकर्षण ठरलेल्या या स्पर्धेत अनेक संघांनी दमदार कामगिरी करत प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले. या स्पर्धेतील अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत बागमळा संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

ही स्पर्धा शनिवारी (दि.७) भगवती गावातील मैदानावर आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्‌घाटन शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. संध्याकाळी ६.३० ते रात्री १२.०० या वेळेत रंगलेल्या या स्पर्धेत परिसरातील अनेक संघांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. खेळाडूंनी दाखवलेल्या उत्कृष्ट खेळामुळे मैदानावर रोमांचक वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र म्हात्रे, शेकापचे ज्येष्ठ नेते सुरेश खोत, शेकाप रेवदंडा शहर चिटणीस निलेश खोत, अभिजीत वाळंज, हेमंत पाटील, नितीन सारंग, मनीष कवळे, चौल ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अजित गुरव तसेच भगवती परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेत बागमळा संघाने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपदाचा मान मिळवला. तर, द्वितीय क्रमांक निनाद स्पोर्ट्स आग्राव, तृतीय क्रमांक शितळादेवी संघ आणि चतुर्थ क्रमांक मोहित स्पोर्ट्स आग्राव यांनी पटकावला. या सर्व विजेत्या



संघांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. दरम्यान, स्पर्धेतील वैयक्तिक कामगिरीत अक्षय नाईक याला मालिकावीर, अभिषेक मिसाळ याला उत्कृष्ट गोलंदाज आणि नागेश सरदार याला उत्कृष्ट फलंदाज हा किताब प्रदान करण्यात आला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)